उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451





RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

सोमवार, १२ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १३४ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Monday, 12 May 2025 | Year : 5 | Issue : 134 | Daily | Rate: Rs. 5/-







## राहुल गांधींचे प्रधानमंत्री मोदींना पत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी, रविवारी दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहीले आहे. या पत्रात प्रधानमंत्री मोदी यांच्याकडे सध्याची परिस्थिती, ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम दहशतवादी हल्ला यावर चर्चेसाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करण्यात आली आहे.

लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी त्यांच्या पत्रात म्हणाले की, 'संसदेचे विशेष अधिवेशन तात्काळ बोलवण्यात यावे या विरोधकांच्या एकमताने करण्यात आलेल्या मागणीचा पुनरुच्चार ते करतात. पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि पहिल्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जाहीर केलेला आजचा शस्त्रविराम यावर चर्चा करावी हे लोकांसाठी आणि त्यांच्या प्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्यासमोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठीचा आपला सामूहिक निर्धार दाखवून देण्याची ही एक संधी असेल. 'राहुल गांधी यांच्यासह राज्यसभेचे विरोधीपक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी देखील एक वेगळे पत्र लिहिले आहे, ज्यामध्ये त्यांनी राहुल गांधी यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.



यापूर्वी 28 एप्रिल रोजी दोन्ही नेत्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विशेष अधिवेशन बोलवण्यासाठी पत्र लिहिले होते.

पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर काँग्रेसने केंद्र सरकारच्या निर्णयांना अधिकृतपणे पूर्ण पाठिंबा जाहीर केला होता. पण आता पक्षातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आता काँग्रेस पक्ष सध्याच्या परिस्थितीबाबात सरकारला प्रश्न विचारणे सुरू करेल. विशेषतः

> भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाटाघाटींमध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप होणार नाही याची सरकारने नेहमीच काळजी घेतली आहे. मग ट्रम्प यांनी शस्त्रविरामाची घोषणा कशी केली? येत्या काळात आम्ही हे प्रश्न उपस्थित करू.
>
> – एका वरिष्ठ नेता

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चर्चेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून सरकारला घेरले जाऊ शकते. काँग्रेसकडून मागणी केली जात असतानाच राष्ट्रीय जनता दलाचे (RJD)नेते तेजस्वी यादव यांनी देखील सरकारला विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली आहे. 'प्रधानमंत्रींना विनंती आहे की त्यांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवावे आणि पहलगाम हल्ल्यापासून ते शस्त्रविराम याची तारीखेनुसार माहिती द्यावी,' असे ते म्हणाले आहेत.

## आंबेडकर कशासाठी हे साहित्यसूत्र व्हावे : प्रा. रणजित मेश्राम



> डॉ. बाबासाहेबांविषयी श्रद्धा असणे हे मान्य केले तरी त्यांचे वेगाने होणारे दैवतीकरण फार धोक्याचे ठरणार आहे. मार्क्सवादात जसे व्यक्तिगत मार्क्स नसतो. त्याचे विचार व आजच्या संदर्भात उपयोजन हेच नेमके असते. तोच मार्ग आपल्याला अवलंबावा लागेल.पुढे ते असेही म्हणाले, नेता ही संज्ञा वा संकल्पना सध्या टवाळकीचा विषय झाला आहे. कार्यकर्ता व संघटना हीही बाब दुय्यम झाली आहे. नेता , कार्यकर्ता , संघटना या संज्ञा जर आंबेडकरी समूहातून बाद झाल्यातर सारी बजबजपुरी माजेल. त्याची चिन्हे सध्याही दिसत आहेत. आपण देव ही संज्ञा नाकारली, नेता ही संज्ञा कधीच नाकारलेली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनेक अंगांनी थोर होते, त्यातही आधी ते थोर नेते होते हे कधीही विसरता येत नाही.
>
> – प्रा. रणजित मेश्राम

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतांना किंवा सांगताना आंबेडकर कोण? आंबेडकर कसे? काय सांगितले यावरच सारा भर असतो. आंबेडकर कां ? कशासाठी? हेच नेमके सांगितले जात नाही. खरेतर आजची तीच गरज आहे. यापूढे आंबेडकर कशासाठी? हे आंबेडकरी साहित्याचे साहित्यसूत्र व्हावे असे आवाहन आंबेडकरी भाष्यकार व ज्येष्ठ पत्रकार प्रा. रणजित मेश्राम यांनी इथे केले. ते आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर एन्ड लिटरेचर संस्थेने दिलेला जीवनगौरव पुरस्कार स्वीकारतांना बोलत होते. हिंदी मोर भवन येथील मधुरम सभागृहात खचाखच भरलेल्या उपस्थितीत झालेल्या या वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी समाजकल्याण उपायुक्त डॉ. सिध्दार्थ गायकवाड हे होते. प्रमुख उपस्थिती शिक्षणतज्ञ राजाभाऊ टाकसाळे हे विराजमान होते. प्रारंभी संस्थेची भूमिका विशद करणारे प्रास्ताविक अध्यक्ष दादाकांत धनविजय यांनी विशद केले. संचालन संस्थेचे सचिव डॉ मच्छिंद्र चोरमारे हे करीत होते. आपल्या धीरगंभीर आवाजात डॉ. बाबासाहेब गेल्यानंतर उपस्थित झालेल्या आव्हानात्मक स्थितीचा आढावा घेत रणजित मेश्राम बोलत होते. हे सांगतांना त्यांनी अस्पृश्यांचा नेता कोण यावरुन गांधी आंबेडकर झालेल्या संघर्षातील काही प्रसंग सांगितले. धम्मदीक्षेच्या प्रसंगात झालेल्या वार्तापरिषदेत प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाच्या ध्येयधोरणाविषयी पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब म्हणाले होते, पक्षाला कणखर नेत्याची गरज असते याकडे लक्ष वेधले. अत्यंत देखण्या अशा या राज्यस्तरीय पुरस्कार समारंभात वेगवेगळे पुरस्कारही देण्यात आले. यात प्रा प्रविण बोरकर (वसंत मून वैचारिक पुरस्कार), चंद्रकांत वानखेडे (बाबूराव बागुल कथा पुरस्कार), शेषराव पिराजी धांडे (नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार), भारत सातपुते (दया पवार आत्मकथन पुरस्कार), विरेंद्र गणवीर (अश्वघोष नाट्य पुरस्कार) यांचा समावेश होता. यासर्वांनी याप्रसंगी आपली मनोगते व्यक्त केली. हा सोहळा संपन्न व यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष भूपेश थुलकर, कोषाध्यक्ष सविता कांबळे, सहसचिव सुरेश वर्धे आणि महेंद्र गायकवाड, सुदेश भोवते, राजन वाघमारे, पल्लवी जीवनतारे, रमेश सोमकुवर, गौरव थुल यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी राजन वाघमारे यांनी आभारप्रदर्शन केले. याप्रसंगी जबरदस्त उपस्थिती होती. याप्रसंगी ताराचंद्र खांडेकर, इ.मो. नारनवरे, लोकनाथ यशवंत, प्रभू राजगडकर, एन.आर. सुटे, संध्या राजुरकर, सुजाता लोखंडे, उज्वला गणवीर, जयश्री गणवीर, पूजा नाखले, विनायकराव जामगडे, जनार्दन मुन, राहुल दहीकर, मिलिंद किर्ती, मिलिंद पवनीपगार, प्रवीण कांबळे, छाया खोब्रागडे सरिता सातारडे, निर्गुणशा ठमके, एम.एस. जांभुळे, सुजाता लोखंडे आदी मान्यवर हजर होते.

## १२ लाख अनुयायी पोहचले बुद्धगया!

### महाबोधी मंदिराच्या नियंत्रणावरून बौद्ध आणि हिंदूंमध्ये संघर्ष सुरूच!

**पटणा :** बिहारमधील जगप्रसिद्ध बौद्ध तीर्थक्षेत्र बोधगया येथे 12 फेब्रुवारीपासून बौद्ध भिक्षू निदर्शने करत आहेत. त्यांची मागणी अशी आहे की बीटी कायदा म्हणजेच बोधगया मंदिर कायदा, 1949 रद्द करावा. या कायद्याअंतर्गत स्थापन होणाऱ्या बोधगया मंदिर व्यवस्थापन समिती (BTMC) मध्ये बौद्धांसह हिंदूंनाही सदस्य बनवण्याची तरतूद आहे, ज्याला बौद्ध भिक्षू बऱ्याच काळापासून विरोध करत आहेत. बौद्ध भिक्षूंनी यापूर्वी महाबोधी मंदिराजवळ आमरण उपोषण केले होते, परंतु 27 फेब्रुवारी रोजी प्रशासनाने त्यांना महाबोधी मंदिर परिसरातून काढून टाकले.



भन्ते प्रज्ञाशील यांनी बोधगया मंदिरात घंटा वाजवणारे आणि ते शिवमंदिर असल्याचे सांगणारे संजय मिश्रा यांची नियुक्ती केली आहे. संजय मिश्रा यांना विचारण्यात आले की, तुम्ही बीटीएमसीचे कर्मचारी आहात आणि तुम्ही महाबोधी महाविहारमध्ये घंटा का वाजवता? तेव्हा ते म्हणाले की, भन्ते प्रज्ञाशील याचे उत्तर देतील आणि त्यांनी माझी येथे नियुक्ती केली आहे. महाविहारमधून बाहेर येताच भन्ते प्रज्ञाशील यांनी वकिली सुरू केली की संजय मिश्रा आणि आकाश लामा यांना बीटीएमसीच्या सचिवाचा फोन आला होता आणि ते संजय मिश्रा यांचीही वकिली करत होते. त्यामुळे दोघेही आटोपशीर असतील असे वाटत होते. तिथंच झाले. आंदोलन रद्द झाल्याची घोषणा होईपर्यंत त्यांचा वेळ गेला होता.

बिहार सरकारने बीटी कायदा 1949 रद्द करावा अन्यथा देशातील वातावरण बिघडू शकते. 12 मे रोजी सूर्योदय होण्यापूर्वी बीटी कायदा 1949 रद्द करण्यात आला म्हणून घोषित करा. अन्यथा सरकारला जनतेची आक्रमकता रोखता येणार नाही.





बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा

:: सदिच्छूक ::

माधुरी मिलिंद लोखंडे

पियुष मिलिंद लोखंडे

प्राजक्ता मिलिंद लोखंडे

चि.प्रयाण लोखंडे




तथागत भगवान गौतम बुद्ध जयंती

सामूहिक वैशाख पौर्णिमा समारोह 2025

बुद्धाब्द २५६९ सोमवार, दि. 12 मे 2025

स्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरुवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर (वानाई)

वैशाख दिनाचा कार्यक्रम

प्रमुख उपस्थिती – भदंत विमलकित्ती गुणसिरी

| | | |
|---|---|---|
| प्रथम सत्र | सकाळी ०७.०० ते ८.०० | वंदना व अष्टशीलासह उपोसथ व्रत ग्रहण |
| | सकाळी ८.०० ते ०९.०० | अल्पोपहार |
| द्वितीय सत्र | सकाळी ०९.०० ते १०.०० | साधनेसह धम्मसवन |
| | सकाळी १०.०० ते ११.०० | धम्म साकच्छा – प्रश्नोत्तरे |
| | सकाळी ११. ०० ते ११.३० | मेत्ताभावना संघ दान |
| | सकाळी ११.३० ते ०१.०० पर्यंत | भोजन दान आणि सामूहिक भोजन |

सोमवार, दि. 12 मे 2025

स्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरुवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर (वानाई)

सहभागी संघटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन (बाहो)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ॲण्ड रिसर्च फाउंडेशन (बाहार फाऊंडेशन)

1942 निमित्त महिला क्रांती परिषद, नागपुर

दैनिक बहुजन सौरभ, नागपूर

संथागार फाऊंडेशन, नागपूर

संघर्ष महिला मंडळ, नागपूर

आवाज इंडिया टीव्ही

आयोजक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी समिती, नागपूर व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स (वानाई), नागपूर

संपर्क

93736411164 | 9960548866 | 9420125757 | 9823074729

बुद्ध जयंतीच्या हार्दिक मंगलकामना!




बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीपरपज सोसायटी

रजि. नं. महा. 717/2005 –नागपूर

: मुख्य कार्यालय :

ब्लॉक नं. 9, धनश्री कर्मशियल कॉम्पलेक्स, हॉटेल हरदेवजवळ, सीताबर्डी, नागपूर- 12.

:: सदिच्छूक ::

संस्थेचे पदधिकारी अनिल नामदेव बहादुरे, सतीश देविदास ओरके, अमृतराज पाटील, रामचंद्र फत्तुजी गेडाम 5) कुलदीप रत्नाकर फुलझेले, राजेश शिवनारायण वाघमारे, नरेश महादेव सावरे, नरेंद्र नामदेवराव सुखदेव, डॉ. सुरेन्द्र सोमजी बोरकर, मधुकर शिवशंकर मून, डॉ. अजय रामदास गजभिय, राजेश राम रतांजी सोनोन, शत्रुघ्न गणपत चवरे. सर्व पदाधिकारी

हरदास नगर अर्बन क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर

रजि.नं.एन.जी.पी./सी.टी.वाय/आर.एस.आर./ (सी.आर.)/ ३७०/८८-८९

कार्यालय : ब्लॉक नं. १ फलक प्लाझा कॉम्प्लेक्स, मोहम्मद रफी चौक, पेट्रोल पंप रोड, यादव नगर, नागपुर - २६

फोन क्रमांक : 0712-2953505 E-mail : hardas0370@gmail.com



बाबू हरदास एल.एन

संस्थेचे विविध ठेव व कर्ज योजना

- मुदत ठेव
- आवर्त ठेव
- दैनिक बचत ठेव
- सभासद बचत ठेव
- कृष्णप्रतिभा ठेव
- साधारण कर्ज
- गृहतारण कर्ज
- स्वयंम रोजगार कर्ज
- शासकीय रोखे तारण कर्ज
- सोनेतारण कर्ज

- ज्येष्ठ नागरिकांना घरपोच व्याजाची सोय व ठेवीवर 1% अधिक व्याज
- संस्थेत ऐच्छिक व खुले सभासदत्व....
- समाजातील बेरोजगार युवक / युवतींना रोजगाराची संधी
- ठेव संकलन अभिकर्ता म्हणुन आकर्षक कमिशनवर नियुक्ती
- महीला सशक्तिकरणाकरीता महीला बचत गट व वैयक्तिक कर्जाची सोय

संचालक मंडळ

भदंत नागदिपंकर महास्थवीर – प्रमुख मार्गदर्शक; कृष्णराव मंडपे – अध्यक्ष; विजय नागदेवे – उपाध्यक्ष

मनोहर शेन्डे – संचालक; शिवदास बोंदाडे – संचालक; प्रविण पिल्लेवार – संचालक; पुरूषोत्तम बोरकर – संचालक; दिपक राऊत – संचालक

नरेन्द्र गाटकिने – संचालक; सचिन जुमळे – संचालक; सौ. प्रतिभा मंडपे – संचालिका; सौ. रेखा लोखंडे – संचालिका; रविन्द्र राऊत – व्यवस्थापक; ॲड. विवेक कराडे – कायदे सल्लागार

बाबु हरदास एल.एन.बहुउद्देशिय संस्था

रजि. नं. नागपूर/ 0000080 / 2024

कार्यालय : कृष्णराव बाबुराव मंडपे, सिद्धार्थ चौक, हरदास नगर, लष्करीबाग, स.नं.17/23, पोस्ट डॉ. बाबासाहब आंबेडकर मार्ग, नागपुर - 440017

संपर्क कार्यालय : ब्लॉक नं. 1 फलक प्लाझा कॉम्प्लेक्स, मोहम्मद रफी चौक, पेट्रोल पंप रोड, यादव नगर, नागपुर - 26

संस्था संचालक मंडळ



अध्यक्ष – भदन्त नाग दिपंकर महास्थविर, मो.: 9423605550

उपाध्यक्ष – कृष्णराव बा. मंडपे, मो.: 9422178198

सचिव – विजय रा. नागदेवे, मो.: 9422818122

सहसचिव – रविन्द्र रामदास राऊत

कोषाध्यक्ष – मनोहर महागुजी शेण्डे

सदस्य - शिवदास सिताराम बोन्दाडे, राजेश रामभाऊ नागदेवे, ओमेश सोपान नगरधने

सदस्या - प्रतिभा कृष्णराव मंडपे



तथागत भगवान बुध्द जयंती

समिती आणि भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दल, बौध्द विहार, आवाज इंडीया टि व्ही, दै. बहुजन सौरभ व सामाजिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने

तथागत भगवान बुध्द

यांच्या २५६८ व्या जयंती निमित्त

सर्व धर्म परिषद

सोमवार, दि. १२ मे २०२५ आणि मंगळवार, १३ मे २०२५

स्थळ : भगवान नगर मैदान, रामेश्वरी पोस्ट ऑफिस जवळ, नागपूर.

कार्यक्रमाची रूपरेखा

सोमवार, दि. १२ मे २०२५ –
सम्राट अशोक चौक ते दिक्षाभुमी
धम्मसकाळ रॅली : सकाळी ६.०० वाजता
शताब्दी चौक ते त्रिशरण चौक रॅली
सायंकाळी ७.०० वाजता

मंगळवार, दि. १३ मे २०२५ –
सायंकाळी ६.०० वाजता
सर्व धर्म परिषद आणि सत्कार समारंभ
मा. प्रबोधनकार अनिरूध्द शेवाळे
यांचा धम्मगीत कार्यक्रम

सर्व धर्म परिषद अध्यक्षता : भंते डॉ. विमलकीर्ती, पुणे

स्वागताध्यक्ष –मा इंजि मदन माटे, माजी कार्यकारी संचालक

मुख्य मार्गदर्शक

मास्टर तरसेम जनागल अमृतवानी – विद्यापीठ धर्म अमृतवाणी संविधान प्रचारक

व्हरंट जी सी बर्वे – ख्रिश्चन धर्मगुरू

हजरत हाफीज अब्दुल बासीत साहब – मुस्लीम धर्मगुरू

मा. मनजितसिंगजी – शिख धर्मगुरू

भंदत धम्मसारथी – बौध्द धर्मगुरू

मुख्य अतिथी

मा. डॉ. भिमरावजी य. आंबेडकर – राष्ट्रीय कार्याध्यक्ष - भारतीय बौध्द महासभा

मा. भीक्खुनी सुनिती – बौद्ध धम्मगुरु

मा. रमेश पहारे

मा. सौ. भारती प्रविण दवने

मा. प्रशांत वावगे

विनीत : तथागत भगवान बुध्द जयंती समारोह समिती, नागपूर

“ त्रिगुन पावन वैशाख पौर्णिमाच्या हार्दिक मंगल कामना ”

## संपादकीय

# बौद्ध धम्माचे व्यापक विश्व

तथागत बुद्धांचा धम्म हा बहुजन हिताय, बहुजन सुखाय आहे. आदि कल्याण, मध्य कल्याण, अन्त कल्याण असा धम्म आहे. बुद्धगया येथे बोधी प्राप्ती नंतर 45 वर्षापर्यंत निरंतर न थांबता तथागत बुद्धांनी चारिका करुन जागो-जागी/ठिक-ठिकाणी उपदेश केलेत. त्यांच्या शिष्यांनी ते कण्ठस्थ करुन ठेवले. तेच बुद्धवचन म्हणून ओळखले जातात. तथागत बुद्धांच्या महापरिनिर्वानानंतर भिक्खु संघानी बुद्धवचन तीन भागात विभाजीत केलेत. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्म पिटक. हे बौद्ध साहित्य अतिशय विशाल आहे. बौद्ध धम्माचे सांस्कृतिक विश्व अतिशय व्यापक आहे. त्यामुळे बौद्ध विषयांचे विश्व सुद्धा अतिशय व्यापक बनलेले आहे. आज बौद्ध साहित्य मानवी जीवनाशी संबंधित जेवढ्या विविध विषयावर आढळून येते नाही. पण ते नव्याने लिहून विचारांची देवाणघेवाण झाली पाहिजे. संदर्भ देऊन विचार गौरविण्यात आले पाहिजे . मनुष्य आयुष्यभर अज्ञानी व अंधश्रद्धाळू होऊन राहतो. दुःखाचे व कष्टाचे जीवन जगतो. मानवी मनाचे अज्ञान समूळ नष्ट करण्यासाठी बौद्ध धम्मातील पौर्णिमांच्या इतिहासाचे अध्ययन फार महत्वाचे आहे. पौर्णिमा ही शितल चांदण्यांची छाया आहे. पौर्णिमा म्हणजे बुद्ध विचार आणि अमावस्या म्हणजे कृतीयुक्त लढा जो छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याची स्थापना होय. बुद्ध म्हणजे शांती होय. युद्धाला हटविण्याची ताकद होय. सारे जग म्हणते युद्ध नको बुद्ध हवा. तो बुद्ध हवा ते बरोबरच आहे. मनुष्यांचे अज्ञान नष्ट होणे याचा अर्थच ज्ञानाची प्राप्ती होय. मनुष्याला ज्ञान प्राप्त होणे याचा अर्थ सुखाची प्राप्ती होणे होय. असत्याला सत्य सांगणे कठीण काम आहे पण सत्याचा शोध घेणे हेच बुद्धत्व होय. खरे तर भर उन्हात झाडाचे महत्व समजते तसेच अंधारात उजेडाचे महत्व समजते. शेवटी कवी म्हणतात. ‘कणाकणा ने ज्ञान वेचूनी प्रबुद्ध हो मानवा’ बुद्ध सर्व सजीव सृष्टीचा विचार घेऊन जगले आहे. वैशाख पौर्णिमेला जन्म आणि महापरिनिर्वाण केवळ बुद्धाला मिळाले आहे. बुद्धांच्या वाट्याला उजेड आला. या उजेडाचे आपणच वाटसरू झालो पाहिजे. या उजेडात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सहभागी करून घेतले आहे. उजेडात आपण प्रकाशमय झालो आहोत. सामाजिक कार्यासाठी जमिनी आणि लाखाचे दान देत आहोत. आदर्श समाज म्हणून सर्वधर्माचे लोक आपणास प्रकाश किरणे म्हणून बघत आहेत. युद्ध नको हत्या बोधीसत्वाची ललकर, शांती दूत बुद्धाने केला धम्माचा स्विकार.

बुद्ध धम्मात पौर्णिमेचा दिवस हा ‘उपोसय दिवस’ म्हणून मानला जातो. उपोसभाच्या दिवशी भिक्खु भिक्खुणी पातिमोक्षाचे पठन करतात. संघात एकता ठेवतात. श्रद्धावान, उपासक आणि उपासिका सुद्धा उपोसथ व्रत घेतात. पौर्णिमा, अमावस्या च्या दिवशी श्रद्धावान उपासक आणि उपासिका शुभ्र पांढरे वस्त्र परिधान करुन सकाळीच विहारात जाऊन ‘उपोसय व्रत धारण करतात. अन्य दिवसाला पंचशीलाचे पालन करतात पण उपोसभाच्या दिनी अष्टशीलाचे पालन करतात. अष्टशील घेण्यापूर्वी क्षमा याचना करुन अष्टशील उपोसभाच्या, व्रत घेतात. दान, शील आणि समाधि यांच्या अभ्यास करुन उपोसय व्रत सफल करतात. बौद्ध धम्मात प्रत्येक पौर्णिमेला विशेष असे अनन्य साधारण महत्व आहे. पौर्णिमेच्या दिवसाला बुद्ध दिवस/बुद्ध डे असे पण म्हटल्या जाते. बुद्धांचा जन्म, ज्ञान प्राप्ती आणि महापरिनिर्वाण वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमेला झाले आहे. या तीनही घटना एकत्र येणे ही आश्चर्यकारक गोष्ट आहे. आध्यात्मिक दृष्टिने बघितले तर कुशल कर्म करुन चांगला विचार सम्पादनाचा मंगल दिवस असतो. तथागत बुद्धांनी कोणत्या पौर्णिमेला कुठे आणि कशा प्रकारे उपदेश दिला. हे आपणास माहीत आहे. मनुष्य जीवन मिळणे, मनुष्याचे जिवंत राहणे, धम्माचे श्रवण करणे कठीणच आहे. हे सत्य जाणून पौर्णिमेच्या दिवशी उपोसय घेवून व्यतीत करावा. धम्मपद, जातक अठ्ठकथा आणि इतर बौद्ध साहित्यात बारा पौर्णिमेच्या महत्वाच्या घटनाचे एकत्रिकरण करुन अभ्यास करायला हवा. 2025 मधे बुद्धगया महाविहार मुक्ती आंदोलनाचा लढा तीव्र झाला आहे. महाराष्ट्रातील धर्मांतरित बौद्ध बांधवांनी तन, मन, धनाने बुद्धगया आंदोलनाला मदत करणे सुरू केले आहे. ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. मंगल कार्यात भिक्खू कडून परित्राण पाठ करून घेणे म्हणजे पाली भाषा दिवस होय. वैशाख पौर्णिमेला प्राणी गणना होते. ही बुद्ध विचारांची निळी पहाट सर्व जीव सृष्टीसाठी सुख आणि शांतीसाठी प्रार्थना करते. 14 ऑक्टोबर 1956 नंतर बुद्ध विचार पुन्हा येथील भूमीवर आले. त्यांची धम्मगाथा ज्ञानाची पाठशाळा झाली. जी बुद्धिस्ट संडे स्कूल नावाने प्रसिद्ध झाली आहे. बुद्धांची हास्यमुद्रा आणि चालते बुद्ध अजून ही उभे आहेत, ठिकठिकाणी युद्ध थांबविण्यासाठी! ■ ■

बहुजन सौरभ

# गौतम बुद्धाचा श्रेष्ठतम पुरुष



**बुद्धाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान अतिशय विशाल असे आहे आणि त्यात जेवताना पाळावयाच्या नियमापासून तर उदात्त जीवन कसे जगता येईल याचा समावेश होतो. त्यांच्या दृष्टीने जीवन जगणे ही कला नसून तो जगण्याचा मार्ग आहे. जीवन दुःखमय आहे असा मूलभूत सिद्धांत मांडून तो दुःख निवारण्याचा मार्ग सांगतो. हा यामध्ये दुसरा कोणी मदत करणारा नसतो. ज्याचा त्यालाच तो मार्ग चालायचा असतो. त्यासाठी स्वतःच प्रकाशित होणे आवश्यक असते. हे काहींना जमते काहींना ते जमत नाही. बुद्ध पुरूषांचे वर्गीकरण खालील प्रकारे करतो. पहिल्या वर्गीकरणात अशी माणसे येतात की, जी अंधारातून प्रकाशाकडे जातात. दुसऱ्या वर्गीकरणात अशी माणसे असतात की जी प्रकाशाकडून अंधाराकडे जातात. तिसऱ्या प्रकारातील माणसे अंधारातून अंधाराकडे तर चवथ्या प्रकारातील माणसे प्रकाशाकडून प्रकाशाकडे जाणारी असतात. पहिल्या प्रकारच्या माणसांना योग्य मार्ग सापडला असतो. अज्ञानाच्या अंधारातून बाहेर येऊन तो प्रकाशात येतो. येथे त्याला जीवनाची पूर्ण कल्पना आली असते. दुसऱ्या प्रकारची माणसे अधोगतीला जात असतात. त्यांची वाट प्रकाशातून अंधाराकडे असते.**

लोकांच्या मानसिकतेवर आधारित असलेले हे वर्गीकरण आहे. कांही माणसे सतत अंधारातच असतात तर काही त्यातून मार्ग काढतात. काही अधोगतीला पोहोचलेली असतात. एकेकाळी प्रगत असलेली ही माणसे त्यांच्या कृतीनेच अधोगतीला पोहोचतात आणि काही सतत चैतन्यमय जीवन जगणारी असतात. त्यांच्या जीवनाचा आलेख यशाकडून आणखी यशाकडे जाणारा असतो. अशा व्यक्तिंच्या जीवनात आध्यात्मिकता आणि ऐहिकता यांची कुशलपूर्वक सांगड घातली असते, ही माणसे सर्वार्थाने सुखी असतात.

म्हणजे काही समाजरचनेत काही स्तरांना मुद्दाम म्हणून अंधारात ठेवले जाते. जीवनमध्ये यांच्यासाठी अंधार कोठडीचा असतेच. अशा माणसांना फक्त अंधारच आहेत असतो. कारण त्यांनी कधी प्रकाश पाहिलेला नसतो. आपण जे जीवन जगणे तेच खरे जीवन असते अशी त्यांची बारणा झालेली असते. खरे तर त्यांचा इथे विचारच खुंटलेला असतो. जर त्यांना कोणी प्रकाशाची ओळख करून दिली तरच ते अंधारातून बाहेरे पडू शकतात. त्यांना वाट दाखविण्यासाठी थोडासा प्रकाशही पुरे असतो. असे घडले ते बुद्ध काळात. तेच घडले 19व्या आणि 20व्या शतकात. जोतिबांनी ज्योत तेवली-तिचा प्रकाश सर्वत्र पसरला. त्याने अस्पृश्यांना वाट दाखविली. 20व्या शतकात हाच प्रकाश प्रखर झाला आणि त्याने जोतिबांनी दाखविलेली वाट चालायची हिंमत लोकांना दिली. हा ज्योतिचा प्रकाश आता ज्वालामुखी बनला. त्या प्रकाशात लोकांनी आपला भूतकाळ स्वच्छ पाहिला आणि भविष्याची वाटसुद्धा हा ज्वालामुखीचा निखार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने अनुभवास आला. बुद्ध माणसाचे वर्गीकरण त्यांच्या कृतीनुसार करतो. त्यांच्या मते काही माणसे स्वतःसाठीच जगतात. दुसऱ्यासाठी नाही. काही माणसे स्वतःसाठीही जगत नाहीत आणि दुसऱ्यासाठीही नाही. काही माणसे दुसऱ्यांसाठी जगतात स्वतःसाठी नाही. काही माणसे स्वतःसाठीही जगतात आणि इतरांसाठीही. यामध्ये चवथ्या प्रकारचा माणूस श्रेष्ठ होय. बुद्ध म्हणतो, या जगाला योग्यतम पुरूषाची गरज नाही. तर या जगाला श्रेष्ठतम पुरूषाची गरज आहे. हा योग्य तर पुरूष हा shes scrzin डार्विनने सांगितलेला पुरूष होय. डार्विनने म्हटले होते की या जगात जो अधिक सामर्थ्यवान असेल त्यालाच जगण्याचा अधिकार राहील, आरे, भन्ते स्पष्ट होणे, जंगलामध्ये राहणाऱ्या श्वापदांना फक्त सामर्थ्याच्या जोरावर जगता येते. जे दुबळे आहेत ते सामर्थ्य असलेल्या प्राण्याकडून मारले जातात. बुद्धाला हे मान्य नाही. श्वापदांसाठी हा नियम कदाचित योग्य असेल. परंतु विचार करण्याची पात्रता असलेल्या मनुष्य समूहाला हा नियम लागू पडत नाही. मानवी इतिहासात ‘बळी तो कान पिळी’ या तत्वाचा वापर करण्याचा प्रयत्न झाला. हिटलरने लाखो ज्यू लोकांना त्यांचे हाल करून संपविले. हीच विचारसरणी कांही भारतातील राजकीय पक्ष अंमलात आणण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांना हिंदू राष्ट्र हवे आहे. जो हिंदू नसेल त्याला या देशात राहण्याचा अधिकार नाही. जे गुजरातमध्ये घडले ते इतरत्रही घडू शकते. जनता जर भावनेच्या आहारी जाणारी असेल तर तर बहुसंख्य हिंदू असलेल्या या देशात अशा लोकांचे सरकार येऊ शकते. जितका काळ ते सत्तेवर असतील तितका काळ त्यांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी उपलब्ध झालेला असेल. इथे कायदा नसेल. आम्ही म्हणू तोच कायदा अशी परिस्थिती असेल.

तिथे न्याय पद्धती त्यांची असेल आणि ज्या एका माणसाने भारताचे संविधान लिहून बुद्धिमत्तेची पद्धत मक्तेदारी समजल्या समाजाची दिवाळखोरी दाखवून दिली, त्या माणसावर सूड ते उगवतील. त्यातून एक भयानक संघर्ष उभा राहील. लोकशाही धोक्यात येईल आणि हुकूमशाहीसाठी मार्ग मोकळा होईल. परंतु आज जर संघर्ष पेटलाच तर अंधारातून प्रकाशात आलेली ही माणसे जय्यत तयारीनिशी रणागंणावर उभी राहतील. ही लढाई अस्मितेची नसेल ही लढाई अस्तित्वासाठी असेल. पेटलेल्या मनाला शांत करणं अवघड असते. पेटलेली मने वणव्यासारखी पेटतच राहतील. यासाठी बुद्ध दुसऱ्या प्रकारच्या माणसाची आवश्यकता सांगतो. हा दुसऱ्या प्रकारचा माणूस म्हणजे श्रेष्ठतम माणूस. हा श्रेष्ठतम माणूस ओळखला जातो तो त्याच्या अंगी असलेल्या नैतिक गुणांमुळे. अशा माणसाजवळ प्रज्ञा तर असतेच. ती जर नसेल तर अंधारातून मार्ग कसा काढायचा हे त्याला समजणार नाही. संकटाच्या काळात ही प्रज्ञा उपयोगी पडते. ही प्रज्ञा व्यक्तिपुरती मर्यादित नसते. संकटकाळी देशाला वाचविण्यासाठी तिचा उपयोग होऊ शकतो. प्रज्ञाहिन माणूस समाजाला, देशाला संकटाच्या खाईत लोटतो. प्रज्ञावान माणूस अशा संकटात सापडलेल्या समाजाला, देशाला खाईच्या बाहेर काढतो आणि तो इथेच थांबत नाही. तो त्यांना पुढची वाट दाखवतो. म्हणजे श्रेष्ठतम माणसाजवळ प्रज्ञांशील आणि करूणा असणे अतिशय आवश्यक असते. प्रज्ञा असेल आणि शील नसेल तर अशी प्रज्ञा हानीकारक ठरू शकते. म्हणून प्रज्ञावान असलेल्या माणसाजवळ शील असणे आवश्यक असते. हे शील म्हणजेच धम्म. हे शीलच माणसामाणसाला एकत्र बांधते आणि करूणा असेल तर अशा एका समाजाची निर्मिती होईल ज्यामध्ये द्वेष, राग असणार नाही.



डॉ. मनोहर जिल्हे
मो. 9730044192

या संदर्भात बुद्ध म्हणतात, ‘मी पृथ्वीला पृथ्वीच मानतो’ या लहानशा एका वाक्यात बुद्ध स्वतःविषयी तर बोलून जातात, परंतु त्या वाक्यात अव्यक्त असा भाग आहे. जो केवळ सूचित झाला आहे तो तुम्हा आम्हा विषयीचा आहे. मी पृथ्वीला पृथ्वीच समजतो असे म्हणत असताना बुद्ध सूचित करतात की, ही पृथ्वी वृक्षांनी, डोंगरदऱ्यांनी नद्या-नाल्यांनी, विशाल सरोवरे आणि समुद्र यांनी भरलेली आहे. इथे विविध पक्षी, प्राणी आहेत. या सगळ्यांची उत्पत्ती या पृथ्वीवरच झाली आहे. माणूसही त्यांचाच एक भाग आहे. म्हणून या पृथ्वीवर प्रेम करा.

ज्यांना बुद्धाची दृष्टी लाभलेली नाही त्यांची नजर आरपार पृथ्वीच्या गर्भात जाऊन पाहते. त्यांना दिसते लपलेले हिरे, कोळसा, सोने, पेट्रोल वगैरे वगैरे, त्यांच्या डोळ्यापुढे नाचत असतो पैसा-व्यापार आणि मग डोंगर पोखरले जातात. सोन्यांच्या, कोळशाच्या खाणी खोदल्या जातात. जंगले तोडली जातात, एक भला मोठा उद्योग उभा राहतो. पैशांच्या राशी जमतात. कोळशाच्या खाणीत काम करणारा कामगार केवळ बाहेरून काळा होतो. ज्यांची मालकी त्या खदानीवर आहे तो आतून काळा होत जातो. यातून प्रचंड मोठ्या इमारती उभ्या राहतात. निसर्गातला साधेपणा हरपलेला असतो. नफेबाजीची जहरी वेळ जिथे शक्य असेल तिथे वाढत जाते. श्रेष्ठतम पुरूष यापासून दूर असतो. जीवनातल्या मलीनतेपासून तो दूर राहतो. उद्दिष्ट्य कितीही चांगले असले तरी ते मिळविण्याचे साधनही तितकेच चांगले हवे असते. तो निर्मितीची भाषा बोलतो विध्वंसनाची नाही. विध्वंसन करायचे झाले तर ते अकुशल विचारांचे अकुशल कर्माचे. हा श्रेष्ठतम पुरूष प्रकाशाची मशाल घेऊन उभा असतो. ती जाळपोळीची मशाल नसते. तो मानवी कल्याणाचा झरा असतो. त्याला ‘स्व’चा स्पर्शही होत नाही. तो सर्वांचा कल्याणकारी मित्र असतो. ■ ■

# बुद्धाचे मानसशास्त्र !



शिक्षणाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्राचे शिक्षण या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. त्याचा अर्थ समजून घेणे फार कठीण नाही. पण अध्यात्माचे शिक्षण, अध्यात्माचे मानसशास्त्र किंवा या दोन्हीमधील संबंध अजून तरी माझ्या लक्षात आलेला नाही. नुसते अध्यात्म कशाला म्हणावे; या प्रश्नाचे उत्तर देखील समजले नाही. काही महत्वाची उदाहरणे पहा....

आदर्श विचार मानल्या जाणाऱ्या साने गुरुजीने आत्मघात करुन घेतला. मनाला खंबीर करण्याचे, मनशक्ती नावाचे शिक्षण देणारे लोणावळ्याचे स्वामी विज्ञानानंद मंत्रालयावरुन उडी मारुन जीव देतात. पॉझिटिव्ह विचार देणारा चित्रपट करुनही सुशांत सिंग राजपुत नैराश्यातून आत्महत्या करतो; आणि नैराश्याशी लढा कसा द्यायचा हे शिकवणाऱ्या शीतल करजगी (आमटे) आपले जीवन संपवते. उच्च विद्याविभूषित दिवंगत कुलगुरूची पत्नी आणि रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ज्योत्स्ना मेश्राम यांनी नवव्या माळ्यावरून उडी घेऊन आत्महत्या केली. लाखो जीवांची हत्या करणारा हिटलर सुद्धा शेवटी आत्महत्या करतो. पाण्यात पोहोणारं बदक वरुन शांत दिसते; पण ते पाण्याखाली आपले पाय किती वेगाने हलवत असते; ते कळत नाही. ते शांतपणे नुसते तरंगतेय; असेच पहाणाऱ्यास वाटते. पण त्याचे कष्ट फक्त त्यालाच माहीत असते.

आध्यात्मिक गुरु म्हणून ओळखले जाणारे भैय्युजी महाराज स्वतःचे जीवन नष्ट करतात. भैय्यूजी महाराजांनी आत्महत्या केल्यानंतर ABP माझा चॅनलवर झाली होती. त्यात बोलताना भैय्यूजी महाराजांचे मित्र अशोक वानखेडे यांनी मानवी स्वभावाचा एक पैलू सांगितला. भैय्यूजी महाराज स्वतः एक अध्यात्मिक गुरू होते. परंतू आपल्या मनातील स्ट्रेस बाहेर काढायला त्याच्या जवळ outlet नव्हता. बाबा आमटे यांची नात डॉ. शितल आमटेचेही भैयुजी सारखेच झाले.

अशा काही उदाहरणातून काय शिकावे? वरून शांत दिसणारी व्यक्ती कितीही धीर गंभीर व शांत दिसत असली तरी ती आतून खंबीर असेलच असे नाही. मनात काय खळबळ असू शकते; ते त्या व्यक्तीलाच माहीत. यावरून आनंदी व सुखी चेहऱ्याच्या आड काय काय दडलेले असेल ते सांगता येत नाही.

म्हणूनच मानसशास्त्राला फार महत्व आहे. पण ज्याला अध्यात्म म्हणतात ते काही खरे नाही. अध्यात्मिक गुरूंना सुद्धा त्याचा अर्थ खरेच कळत असेल का? यावरून एकच गोष्ट महत्वाची वाटते की; मानवी मनाला उत्सर्जनाची वाट (outlet) मोकळी असणे आवश्यक असते. इतके महत्वाचे असते का हे आऊटलेट? होय! कोट्यावधी रूपये खर्च करून विशाल जलसाठा करण्यासाठी धरण बांधले. पण त्याला आऊटलेट नसेल तर काय होईल? निश्चितच धरण फुटेल. मनाचेही तसेच आहे. आनंदाचा बांध आपल्या हसण्या बोलण्यातून फुटतो पण मानवी मनाला अनेक दुःख पचवण्याची क्षमता असते. पण मानवी मनात समस्यांचे प्रमाण अती झाले तर या शरीराचेसुद्धा धरण फुटत असते. कारण ते मनात साठवून ठेवण्यास काही मर्यादा असते. ती मर्यादा संपली की त्याचाही असाच स्फोट होतो. त्याचाच परिणाम म्हणून वरील उदाहरणांची प्रचिती होय. इतके महत्वाचे असते हे आऊटलेट. मानवी मनाला पुरेसे आऊटलेट नसेल तर अशा घटना घडणे अपरिहार्य होत असते. म्हणून प्रत्येकाने आपल्या मनाचे आऊटलेट सदैव सताड उघडे ठेवले पाहिजे. आपल्या अंतर्मनाचे आऊटलेट खूले ठेवण्यासाठी आपण आपल्या समस्या आपल्या माणसांना सांगणे आवश्यक असते. त्यासाठी विपस्सना (meditation) चा अवलंब करायला हवा. जगातील सगळ्यात मोठे आऊटलेट म्हणजे आपले डोळे उघडे ठेवता आले पाहिजे. आपले दुःख व्यक्त करून आसवांचा बांध फुटून जाऊ दिला पाहिजे. त्यातून आपल्या मनातील सर्व ताण, तणाव, दुःख, अपेक्षा आणि उपेक्षा वाहून जात असतात. पंख्याला लटकण्याने, पाण्यात उडी घेतल्याने किंवा पिस्तुलच्या गोळीने डोक्याला छिद्र पाडल्याने ते बाहेर निघून जात नाही. असे करून स्वतःचे नुकसान करण्यापेक्षा हा सोपा मार्ग निवडला पाहिजे. पण त्यासाठी जीव लावणारा मित्र, नातलग किंवा आपला कुणी तरी हितचिंतक असला पाहिजे. त्याच्या खांद्याचा आधार घेऊन मन मोकळे करता आले पाहिजे.



प्रा. डॉ. भीमराव गोटे
9822235029

मानवी जीवनात आनंदापेक्षा दुःखाचे क्षण अधिक असतात. आनंद हा तात्कालिक असतो; पण दुःख वेळखाऊ असते. राग आला तर तो बोलून वा चिडून व्यक्त होऊ शकतो. त्यासाठी भांडण करण्याची गरज नाही. तसेच दुःख रडून किंवा जवळच्या व्यक्तीला सांगून हलके करता येते. अशा प्रकारे व्यक्त होऊन मुक्त होता येते. त्यासाठी भांडण्याची, तोड फोड करण्याची, कुणाला मारण्याची किंवा आत्महत्या करण्याची मुळीच गरज नाही. यातून स्वतःचे व आपल्या जीवलगांचे नुकसान टाळता येते व आपले आयुष्य आनंदाने नाही पण सुखाने व समाधानाने जगता येते. यात आपल्याला येणाऱ्या रागापेक्षा आपल्या हितचिंतकाचा राग व टेंशनसुद्धा जास्त महत्वाचे असतेय; हे लक्षात घेतले पाहिजे. हेच तर बुद्धाने धम्मपदातून स्पष्ट केले आहे. ■ ■

## वाचकांचे विचारपिठ
बहुजन सौरभ

### डॉ. बाबासाहेब लिहतात...

‘पैश्यांची फार कमतरता आहे, त्यामुळे नवीन पुस्तके विकत घेण्याइतकी क्षमता नाही. पण ज्ञानाची भूक एवढी तीव्र आहे. सध्या मुरंबा लावलेला पाव त्या पावाचे दोन चार तुकडे करून उदरनिर्वाह करतो. ग्रंथालयात खाण्यावर बंदी आहे. पण वेळ मिळताच मी कोणाचे लक्ष नसताना ते खातोय. सकाळ झाली की ग्रंथालयात केव्हा संध्याकाळ उलटते कळत नाही. काही पुस्तकांची पाने वाचायची राहिले की ती रुखरुख जीवाला लागते. मी पान क्र. लक्षात घेऊन पुनःश्च उद्या सकाळी ते पुस्तक वाचायला घेतो. खूप जबाबदारी आहे. माझा शैक्षणिक उद्देश हा एकमात्र आहे. तो म्हणजे प्रचंड ज्ञानसाधना. पुस्तकात रमल्यानंतर कशाचे भान उरत नाही. पुस्तकांची पाने चाळताना मला कसलाच बाहेरचा गोंगाट ऐकू येत नाही. भूक सतावत नाही. तहानही फारशी लागत नाही. संध्याकाळी एकवेळच जेवण घेतो. जेवण फार मोजके असते. अगदी जगण्यासाठी लागेल इतकेच. भाकरीची फार आठवण येते. पावाचा तुकडा खाताना ग्रंथपालाची नजर पडलीच आणि ते रागावले. खरेतर त्यांचे ते रागावणे साहजिक होते. मी खरेतर ग्रंथालयाचा नियम तोडला होता आणि त्यासाठी मी त्यांना म्हटलेही की यापुढे असे काही होणार नाही. त्यांचा रागावलेला चेहरा हास्यस्मितात कधी बदलला कळाल नाही आणि गोऱ्या साहेबांच्या ठसक्यात म्हणाला की, आंबेडकर उद्यापासून दुपारचे जेवण माझ्यासोबत घ्यायचे मी उद्यापासून माझ्या डब्याची क्षमता वाढवून आणतो. खरेतर फार गलबलून आले तेव्हा. शिक्षण, वाचन, संशोधन यामध्ये कधीही खंड पडता कामा नये. परिस्थिती कितीही वाईट असली तरी तिथून मार्ग काढावाच. भूक, फार तीव्र असते. एक भूक शरीरासाठी असते आणि दुसरी मेंदूची भूक. एक केवळ जगण्यासाठी पुरेशी आहे पण दुसऱ्या भुकेविना जगणे अशक्यच.

भंते शाक्यपुत्र राहुल
मो.9834050603

# या धरातलावर मैत्रेय बुद्ध विद्याधर डॉ. आंबेडकर आहेत...

**जन्मापासूनच राजकुमार सिद्धार्थ मातृत्व सुखापासून वंचित होते, तसेच भीमराव आंबेडकरही मातृत्व सुखापासून वंचित झाले होते. बालपणात जखमी राज हंसाला उपचार करून जिवंत ठेवले, तेंव्हापासूनच सिद्धार्थाच्या मनात बुद्धांकुर उपजले. तसेच भीमराव आंबेडकरांचा माध्यमिक शिक्षा उत्तीर्ण सत्कारात गुरुवैर्य केळुस्करनी लिहलेली ‘बुद्ध चरित्र’ पुस्तिका भेट केली, तेंव्हापासूनच भीमरावांच्या मनात बुद्धांकुर उपजले होते. पांच वर्षाचा भीमरावला सोडून माता भिमाईनी शेवटचा निरोप दिला. रामजी सकपाळ (सुभेदाराला) म्हणाल्या, भीवा खूप जिद्दी आहे, स्वाभिमानी आहे, तो अन्याय सहन करीत नाही. मी गेल्यावर त्याच्या शिक्षणात कमी पडू देऊ नका. मी नसतांना ‘शिक्षा’ हीच त्याची आई ठरणार आहे. हे शब्द भीवानीही ऐकले होते. शिक्षणामुळे भीमराव मोठे विद्वान झाले. एका प्रसंगी साताऱ्याला जाऊन एका मोकळ्या ओसाळ मैदानात सहस्त्रबुद्धेला म्हणाले, इथे माझ्या आईच्या आठवणी आहे. याच रान मैदानात तिने खडी फोडून आम्हा सर्व कुटुंबाचा सांभाळ केला होता.**

मी खूब शिकलो हे बघायला ती हयात नाही आणि धडाधड अश्रू काढत रडायला लागले. आतून डॉ. आंबेडकर किती मृदुल होते हे या प्रसंगावरून कळते. तसेच राजकुमार सिद्धार्थ त्यांच्या आईच्या नावाच्या छायादार वृक्षाखाली जाऊन मृद अंतःकरणाने बासुरी वादन करुन दुकःख स्मरण करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्लाट वाजून स्वतःचा तणाव दूर करीत होते. ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ ग्रंथावरून अनुभूती होते कि ते बुद्धाच्या किती समीप आहे.

दि. 12 डिसेंबर 1954 ला रंगून बर्मा देशातील (कवाया) सातव्या बौद्ध धम्म संगीतीत डॉ. बाबासाहेबांना आमंत्रित करण्यात आले होते. वक्तव्य प्रस्तुत करण्याची स्वास्थ्यगत अवस्था नव्हती. परंतु एका बर्मी स्थविराचे वक्तव्य होते कि जिथे बुद्धाचा जन्म झाला तिथे धम्माची दशा जीर्ण शीर्ण आहे. हे ऐकून डॉ. बाबासाहेब वक्तव्य प्रस्तुत करण्यास तयार झाले आणि म्हणाले स्वतंत्र भारताची मुद्रा अशोक स्तंभ, चहू दीर्घ दहाडते सिंह, बुद्धाची धम्म गर्जनाचे प्रतीक आहे. भारताच्या राष्ट्रीय ध्वजावर फडकणारे अशोकचक्र धम्म चक्राचे रूप आहे. राष्ट्रपतीच्या सर्वोच्च सिंहासनावर ‘सत्यमेव जयते’ उत्कीर्ण आहे. राष्ट्रपती भवनातील प्रमुख अशोका हॉल (कमऱ्यात) बुद्धाची धम्मचक्र प्रवर्तन मुद्राची भव्य प्रतिमा स्थापित आहे. मूर्तीच्या खाली धम्मचक्र प्रवर्तनाय उत्कीर्ण आहे. भारतात धम्माचा तना मजबूत झाला आहे आणि येत्या कालखंडात लगेच फांद्या फुटून फुल-पत्ते उगवून धम्म वृक्ष हिरवेगार होणार आहे. त्याच सभेत चेयरमॅन अर्हत सोनी यांनी आपल्या संबोधनात म्हणाले कि धम्माचा विलोप झाल्यावर बुद्धानंतर 2500 वर्षांनी मैत्रेय बुद्ध या पृथ्वीवर प्रकट होणार, अशी कल्पना पुरातन बुद्ध धम्म साहित्यात आहे आणि हा मैत्रेय बुद्ध राजकीय परिधान युक्त असेल. त्या अर्हतांशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चेयरमॅन आर.एल.सोनी यांना जाऊन भेटले व म्हणाले, मी निश्चय केला आहे कि 1956 ला दीक्षा घेणार आहे. अर्थात बुद्धानंतर 2500 वर्ष पूर्ण होतात. जनश्रूती आणि साहित्य कृतीचा हा ऐतिहासिक संयोगच आहे कि काय? आम्ही पाहतो, सन 1882 मध्ये पुरावेत्ता भगवानलाल इंद्राजीनी तत्कालीन कलेक्टर ‘मृलाक’च्या साहाय्याने सोपारा (मुंबईच्या) स्तूपाचे पुरा. उत्खनन केले. त्यात एक



पाषाण संदूक सापडला. त्यात पुन्हा धातूची अंडाकार मंजुषा होती. तिच्यात सात बुद्ध प्रतिमा तीन-तीन इंच अंतरावर होत्या. एक मोठी प्रतिमा भिक्षापात्र घेऊन दुसऱ्या प्रतिमेच्या हाती सोपवीत आहे. ती प्रतिमा राज मुकूट आणि शाही परिधान युक्त आहे. तोच ‘मैत्रेय बुद्ध’ असा निष्कर्ष पुरा. वेत्ता विशेषज्ञ यांनी दिला. अवती भवती 320 स्वर्ण फुले, 164 आठ पंखुडीचे कमल पुष्प, 56 चमेली, 90 बकुली व 10 मोगऱ्याचे स्वर्ण फुल आणि बिडाचे मणिरत्न, छिद्रयुक्त मोती सापडले. ही तिहेरी माळ महारट्ठी गौतमीची असावी, कारण सम्राट अशोकाच्या काळात सत्कर्णी प्रथम द्वारा बुद्धाच्या अस्थिवर हा भव्य स्तूप निर्मित केला होता. हि सामग्री येत्या मैत्रेय बुद्धाचे साक्ष्य वर्णन प्रकट करीत आहे. पुरातन बौद्ध साहित्यात जी कल्पना अंकित आहे तेच हे प्रमाण प्रदर्शित होत आहे. या सामग्रीत एक चांदीचा सिक्का मिळाला, त्यावर ‘सीरियन सात कनीस रानी गौतमी पुत्तस्स’ उत्कीर्ण आहे. दुसऱ्या बाजूला त्रिताल स्तूप उत्कीर्ण आहे. ही सामग्री मुंबईच्या ‘प्रिंस ऑफ वेल्स’ संग्रहालयात सुरक्षित व प्रदर्शनार्थ आहे. डॉ.आंबेडकराचे प्रयत्न आणि संघर्ष बघून हेच सिद्ध होते, त्यांची निर्वैर्यता व मैत्री भावना किती प्रचंड होती. 30 जाने. 1948 ला एक हत्यारा महात्मा गांधीच्या उरात गोळी दागतो. ही सूचना नानकचंद रत्तू डॉ. बाबासाहेबांना कळवतात, तेव्हा ते एक पुस्तक वाचण्यात मग्न होते. त्यांचे हाथ कंपकंपीत होते. पुस्तक जमिनीवर कोसळले आणि डॉ.आंबेडकर खालीच बसले. ओठातून ‘ओम मणी पद्मे हुं’ मंत्र पुटपुटत होते. जीवनभर ज्या व्यक्तीशी संघर्ष केला त्या व्यक्तीच्या मृत्यूवर ते किती हळहळत होते. यालाच म्हणतात बुद्धाची निर्वर्य मैत्री भावना. त्यांचा संघर्ष वैयक्तिक नसून वैचारिक होता. डॉ. बाबासाहेब म्हणतात, जीवनभर मी संघर्ष केला, हा संघर्ष आधीही होता आणि पुढेही असणार. परंतु हा संघर्ष कोणत्याच व्यक्ती विशेष, जाती, धर्म व संप्रदायाविरुद्ध नाही. माझा संघर्ष त्या कुटील भावनांशी आहे, जी बुद्धाच्या समतेच्या विरुद्ध आहे आणि हि कुटील भावना सर्वसामान्य लोकातही असू शकते. बुद्धाच्या मूळ उपदेशाचे स्त्रोत ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ लिहलेल्या त्यांच्या ग्रंथावरून अनुभूती होते कि ते बुद्धाच्या किती समीप आहे. म्हणूनच त्यांना बोधिसत्वाची उपाधी प्राप्त झाली. संविधानातली प्रति व्यक्ती स्वतंत्रता त्यांना बुद्धाच्या ‘कालाम सुत्तात’ सापडली. बुद्ध म्हणतात हे कालामो, परंपरेनुसार किंवा कोणत्याही आदी ग्रंथानुसार अथवा आदी महापुरुषाच्या उपदेशावरून कोणतेही विधान स्वीकार करू नका. त्या विधानाला निरखून परखून बघा, जसे सोनार सोन्याला भट्टीत तपवून तपासतो, तेव्हाच ते विधान स्वीकार करा. संविधानातली ‘समता’ त्यांना ‘अश्वलायन सुत्तातून’ सापडली. बुद्ध म्हणतात, हे अश्वलायनो सत्य भाषेत उत्तर द्या, तुमचा जन्म कोणापासून झाला? अश्वलायन म्हणतात, आमचा जन्म आमच्या मातेपासून झाला. बुद्ध म्हणतात, मग तुमचे शास्त्र, पुराण कसे म्हणतात कि कोणी ईश्वराच्या मुखातून जन्मले, कोणी भुजातून जन्मले, कोणी पोटातून जन्मले आणि कोणी पायातून जन्मले. या जगात सगळे पशु, पक्षी, मनुष्य सुद्धा आपल्या मातेपासूनच जन्म घेतात, तेव्हा सर्व मनुष्य व पशु, पक्षी सुद्धा समान दर्जाचे असावे आणि सर्वांना जगण्याचा अधिकार असावा. हेच विधान सत्य आहे. अश्वलायन संतृप्त झाले आणि भिक्षु संघात प्रविष्ट झाले. दि. 26 नवंबर 1949 ला विश्वात उत्कृष्ट संविधान देशाला अर्पण झाल्यावर, कट्टर विरोधी वल्लभभाई पटेल म्हणतात, जातिगत कारणावरून डॉ.आंबेडकरांना ओळखण्यात आम्ही मोठी भूल केली आणि किमती वेळ घालवला. संविधान घडविण्याइतके कठीण कार्य त्यांच्याशिवाय कोणीच निभावू शकले नाही. प्र. के. अत्रे व वी. एन. गाडगिल घोर विरोधी होते. परंतु डॉ. बाबासाहेबांचे विचार व उद्देश्य बघून आजीवन त्यांचे शुभचिंतक बनून राहिले. गांधीभक्त जगताप कपूर डॉ. बाबासाहेबांचे अभिन्न प्रशंसक होते. टी. टी. कृष्णम्माचारी साक्षात डॉ. बाबासाहेबांची मेहनत, लगन व दूरंदेशी आणि निष्पक्षता बघून सदैव प्रशंसक होते. मुम्बईचे प्रधानमंत्री जनाब साहिल साहब म्हणतात, कोणाला आम्ही राष्ट्रपिता म्हणतो तर डॉ. आंबेडकरांना खरे राष्ट्रभक्त म्हणता येईल. प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू जेंव्हा कधी विदेशी पाहुण्यांशी परिचय करीत असतांना म्हणायचे, ‘डॉ.आंबेडकर इज द डायमंड इन माय केबिनेट’. डॉ.राजेंद्रप्रसाद (प्रथम राष्ट्रपती) डॉ. आंबेडकरांशी निरंतर संपर्कात राहून सलाह मशविरा करता-करता अभिन्न मित्र बनले होते. असा कोणी दुसरा मैत्रीभाव पाळणारा बोधिसत्व बुद्धाच्या 2500 वर्षानंतर इतिहासात शोधता मिळत नाही. मैत्रेय बुद्ध होण्या करिता आणि बनविण्याकरिता आणि ठरण्या करिता अनेक संगठन आतुर आहेत, परंतु या कसोट्या पूर्ण केल्याशिवाय शक्य नाही. ■ ■



धम्मपाल देशभ्रतार
मो. 9131422581

“ त्रिगुन पावन वैशाख पौर्णिमाच्या हार्दिक मंगल कामना ”




बुद्ध आणि त्यांचा धम्म शांती आणि अहिंसेचा धम्म म्हणून जगात ओळखला जातो. बुद्धाने अहिंसा म्हणजे नेमके काय आणि हिंसेवर मात कशी केली जाऊ शकते या संदर्भातील सिद्धांत प्रतिपादित केला. हिंसा हा सजीव प्राण्यांमधील एक महत्वाचा आणि स्वाभाविक घटक आहे. हिंसा ही कोणत्याही स्वरूपात वाईट आणि घृणास्पदच आहे. तरी सुद्धा हिंसेचा पूर्णपणे त्याग संभव नाही. हिंसा ही काया, वाचा आणि मनाद्वारे केली जाते. प्राणी हिंसा, जीव हिंसा करूनच हे सत्र थांबत नाही तर शब्दरुपी शस्त्र आणि मन रुपी अस्त्र हेही तितकेच घायाळ करणारे आहेत. प्रत्येक सजीवाला जगण्याचा सारखाच हक्क निसर्ग देतो. त्यांना संपविण्याचा कोणालाही हक्क नसतो. पण याच नैसर्गिक चक्रात जिवंत राहण्याच्या आणि जीव घेण्या संदर्भात निसर्ग एक गंभीर अशी मूक संमती देतो. ही मूक संमती विशिष्ट प्रसंग आणि घटनेशी संबंधित असते. निसर्गाने दिलेली ही मूक संमती सामाजिक समतोल किंवा निसर्गाचे हे चक्र अबाधित ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. निसर्गगाणे हिंसेची दिलेली ही मूक संमती विवेकावर विसंबून असते. सद्सद्विवेक बुद्धी आणि निसर्गाने दिलेली ही मूक संमती ही एक समीकरण आहे आणि प्रत्येक सजीवाला ते समजून घेणे तितकेच आवश्यक आहे.

निसर्गाने हिंसेची दिलेली ही मूकसंमती म्हणजे निसर्गाने मानवावर मानवी जीव सृष्टीला जिवंत ठेवण्यासाठी, पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी आणि सामाजिक स्थैर्य राखण्यासाठी दिलेली ती एक जबाबदारी आहे. निसर्गाने मानवावर सोपविलेली ही जबाबदार समजून घेण्याची पात्रता बुद्धाशिवाय कुणालाही नाही. हिंसे संदर्भात जी विविध मते प्रतिपादित केलेली आहेत. त्यात हिंसा ही मानवी जीवनातून पूर्णपणे वजा करणे किंवा हिंसेशिवाय जीव सृष्टीचे अस्तित्वच शक्य नाही असे मतही प्रतिपादित करणाऱ्या विचारधारा अस्तित्वात आहेत. निसर्गाचे मानवी जीवसृष्टीच्या अस्तित्वा संदर्भातील गूढ बुद्धाशिवाय कुणालाही गवसले नाही. हिंसे संदर्भातील योग्य आणि अयोग्यतेच्या मतवाद्यानी निसर्गाच्या या नियमांचा गांभीर्याने विचार केलेला दिसत नाही. बुद्ध योग्य अयोग्यतेच्याही पलीकडे जाऊन विवेकाचा विचार करतात. सृष्टीचे चक्र विस्कटू नये याची काळजी घेतात. म्हणून बुद्ध हिंसेचे समर्थनही करीत नाही आणि हिंसेचा विरोधही करीत नाही. बुद्ध हिंसेच्या संदर्भात मानवाला करुणा, मैत्री, दया आणि प्रेम, आणि शांती शिकवतात. बुद्ध निसर्गाच्या मूक संमतीला माध्यम मार्गाच्या विवेकी सिद्धांतात मांडतात.

हिंसा घडून येण्यासाठी अनेक कारण आहेत. पण त्यातील ठळक दोन कारणे म्हणजे संरक्षणार्थ केलेली हिंसा आणि स्वार्थाने, द्वेषाने प्रेरित हिंसा, बुद्ध त्यांच्या अहिंसेच्या सिद्धांतात हिंसेची आवश्यकता आणि हिंसेची इच्छा यावर भर देतात. हिंसेची आवश्यकता ही संरक्षणार्थ असेल तर हिंसेची ईच्छा ही स्वार्थाने किंवा द्वेषाने प्रेरित असेल, बुद्धाचा हा सिद्धांत तर्काच्या आणि विवेकाच्या कसोटीवर पूर्णपणे उतरणारा आहे. बुद्धाने हिंसेला त्यांच्या धम्मत्त्वात स्थान दिले. पंचशीलातील पहिले आणि महत्त्वपूर्ण शील म्हणून त्यांनी अहिंसेची बाजू मांडली. अहिंसा हे मानवी जीवनातील अत्यंत महत्वाचे मूल्य म्हणून अहिंसेचा पुरस्कार केला. त्या अर्थाने शील हे माणसाच्या विवेकाची परीक्षा ठरतात. बुद्धाने अहिंसेला म्हणूनच नियमात बांधले नाही. निरपराध व्यक्तीच्या संरक्षणासाठी हिंसेच्या उपयोगाचे स्वातंत्र्य शीलामध्ये आहे. नियमात स्वातंत्र्याच्या अभावामुळे व्यक्ती कोणतेही निर्णय घेऊ शकत नाही. नियमाला बांधिल असल्यामुळे त्याच्या कृतीवर मर्यादा पडतात. हा एक फरक नियमात आणि शिकत आहे. नियमातील कठोर बंधनात अहिंसा ही गुदमरून जाईल. तिला विवेकशीलतेचा गंध राहणार नाही. हे बुद्धाने जाणले. म्हणून नियमांच्या कोठडीत स्थान न देता शिलांच्या सद्गुणी पथात स्थान दिले. हिंसा करणे किंवा न करण्याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य बुद्धाने माणसाच्या विवेकावर सोडले. हिंसा करू नये म्हणून कायदे करण्यात आले. शिक्षेची तरतूद करण्यात आली. कायद्याच्या आणि शिक्षेच्या भीतीने मनुष्य हिंसा करणार नाही ही शक्यता आहेच. पण या सर्व प्रसंगी माणसाचा विवेक हा महत्त्वाचा ठरतो. विवेकहिनता कायद्याचेही बंधन पाळत नाही. शीलवान मनुष्याला त्याचा निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असूनही त्याच्या हातून निरपराध व्यक्ती मारल्या जावू नये याची खबरदारी तो घेतो. बुद्धाचा पंचशीलांचा सिद्धांत हा माणसाच्या विवेकाला एक आव्हानाच्या स्वरूपात आहे. शील हे नियमांच्या गठ्ठ्यात बांधले नाहीत तर ते कर्तव्य आणि व्रत यावर अवलंबून आहेत. बुद्धाने माणसाचा विवेक जागृत ठेवण्यासाठी अहिंसा मूल्याला दया, करून आणि मैत्रीची जोड दिली. शील, प्रज्ञा, करुणा मैत्री ही अहिंसेची पूरक तत्वे म्हणून प्रतिपादित केली. ही पूरक तत्वे अहिंसेचे अस्तित्व जतन करणारे आहे. दया, करुणा आणि मैत्री या भावना स्वरूपात असल्यास त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्याला कृतीची जोड असावी लागते. शील, करुणा आणि प्रज्ञाला कृतीची जोड आहे. ही तिन्ही तत्वे कृतिशील तत्वे म्हणून मानवी जीवनात विद्यमान असतात. बुद्धाच्या धम्माचे वैशिष्ट्य म्हणजे तो एक आचार आणि विचार धम्म म्हणून ओळखल्या जातो. बुद्ध जीव हिंसेला नकार देत असतांनाच हिंसेच्या स्वाभाविक आवश्यकतेचाही विचार करतात. सुत्त निपाताच्या आमगंध सुत्तातात बुद्ध अहिंसेचा अर्थ कथन करतात. हिंसेत फक्त प्राणघातच अपेक्षित नसतो तर चोरी, असत्य भाषण, ठकविणे, इतराना लुटणे, उपद्रव करणे, परस्त्री गमन, दुःशील, भेसूर शिवीगाळ, अनादर करणे, क्रोध, मद, कठोरता, विरोध, माया, ईर्ष्या, व्यर्थ बडबड, मानातिमान, पापी, कर्ज बुडविणारे, कुचेष्टा करणे, खोटा व्यवहार करणे, चुगली, चहाडी, निंदा हे सर्व वाचिक आणि मानसिक हिंसेचे प्रकार बुद्ध सांगतात. म्हणून बुद्धाचा अहिंसेचा सिद्धांत ही एक मानसिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. या मानसिक परिवर्तनात्त विचारसरणी, भाव भावना, कृती, वर्तन आणि व्यक्तिमत्वात होणारे बदल अपेक्षित असतात. ■ ■



सरोज डांगे
9423974240

## अनुकरण

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

आजी आपल्या छोट्या नातवाला घेऊन सकाळी विहारात आली. ती गाथा वाचू लागली. नातू डोळे मिटून शांत बसला होता. त्यानंतर वंदनेत तो आनंदाने सहभागी झाला. इतर लहान मुले मात्र गडबड, गोंधळ करीत होती. सायंकाळी त्याचे वडिल त्याला सार्वजनिक वाचनालयात घेऊन आले. वडिल वाचनात गुंग झालेले. तो देखील कार्टून अन् विविध चित्र असलेली लहान मुलांची पुस्तके चाळण्यात तल्लीन झाला. त्यांचा हा दिनक्रम ठरलेला. एके दिवशी त्यांचा शेजारी म्हणाला, ‘माझे नातू सतत टिव्ही आणि मोबाईलमध्ये गुंतलेले असतात, पण तुमचा मुलगा पुस्तके आणि वंदनेत रमलेला असतो. हे कसे काय शिकवले त्याला? आमचें नातू तर आमचे जरासुद्धा ऐकत नाहीत.’ त्यावर मुलाचे वडिल म्हणाले, ‘मुले कुठे कोणाच काही ऐकतात? मुले तर फक्त वडिलधाऱ्यांची नक्कल करतात, ते आपले अनुकरण करतात. या गोष्टीचे ज्येष्ठांनी स्मरण ठेवावे, कारण त्यावरच लेकरांचे आचरण अवलंबून असते.’ त्यावर शेजारी म्हणाला, ‘खरे आहे तुमचे. लहान लेकरांचे मन हे कोऱ्या कागदांसारखे असते. त्यामध्ये संस्काराचे रंग भरणे ही आपली जबाबदारी आहे. लहान मुलांना एखादे खेळणे किंवा भेटवस्तू जर दिली नाही तर, तो काही वेळ रडेल. पण योग्य संस्काराची भेट वेळेवर दिल्या गेली नाही तर, त्याचेवर आयुष्यभर रडायची वेळ येईल. मुलांना संस्काराशिवाय सुविधा दिल्या तर तो भरकटत जाऊ शकतो. आज मला समजले. मिलता है जो हमें, परिवार से संस्कार में जाता नहीं है है वह कभी भी, यूँ बेकार में डिग्री महज एक कागज का टुकडा हैं. शिक्षा अगर दिखें ना रोज, आपके व्यवहार में. ■ ■

बहुजन सौरभ

# अधम्म आणि सद्धम्म समजल्याशिवाय धम्म समजणार नाही

**डॉ. बाबासाहेबांनी केलेली धम्मक्रांती हे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन आहे. हे घडवून आणताना डॉ. बाबासाहेबांनी पूर्वीच्या धर्मातील कोणतीही घाण बौध्द धम्मात आणायला संपूर्ण बंदी घातली. त्यामुळे धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचे नियमित आचरण करणे धम्माचा जलाशय शुध्द ठेवण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. यात धम्माचा सार आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांप्रमाणे धम्म समजण्यासाठी अधम्म व सद्धम्म सुध्दा समजला पाहिजे. त्यांच्या मते हे वर्गीकरण बुध्दांनीच केले असून या तिन्ही वर्गाची नीट ओळख झाल्याशिवाय धम्म समजणारच नाही.**

डॉ. बाबासाहेबांनी बुध्दांच्या सामाजिक शिकवणीवर अधिकाधिक भर दिला आहे. सर्वांना जवळ बाळगता येईल, या प्रकारचा बायबलच्या आकाराचा बौध्द धम्मावर ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा मानस होता. तो त्यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. त्यामध्ये ते म्हणतात, बुध्दांनी आपल्या धम्माचे एक वेगळेच वर्गीकरण केले आहे. पहिल्या वर्गाला बुध्दांनी धम्म ही संज्ञा दिली. त्यांनी एक नवीन वर्ग निर्माण केला व त्याला अधम्म असे नाव दिले. त्यांनी तिसराही वर्ग निर्मिला व त्याला सद्धम्म अशी संज्ञा दिली. डॉ. बाबासाहेबांनी केलेली ही मांडणी तर्कशुद्ध आहे. त्याकडे दुर्लक्ष करून सद्य स्थितीत बौध्द धम्माचा प्रचार केवळ विपश्यनेच्या, ध्यान साधनेच्या मार्गाने अधिकाधिक केला जात आहे. त्यातून कोणत्याही प्रकारची सामाजिक चेतना निर्माण होत नाही. याचेही उत्तर डॉ. बाबासाहेबांच्या याच ग्रंथात मिळते. बुध्दांच्या सामाजिक संदेशाची आठवण करून देत डॉ. बाबासाहेब विपश्यनेला बौध्द धम्माचे सार समजणाऱ्यांना व त्यांच्या केवळ अहिंसा व शांतीच्या तत्वांना कवटाळून बसलेल्यांना डॉ. बाबासाहेब प्रश्न करतात की, भगवान बुध्दांनी न्याय, प्रेम (मैत्री), शिकविली नाही कां, स्वातंत्र्य, समता, बंधुता शिकविली नाही कां, बुध्द कार्ल मार्क्सला उत्तर देऊ शकतात कां व या सर्वांचे उत्तर त्यांनी होय, असे दिले आहे. त्यामुळे बुध्दांचा सामाजिक संदेश प्रसारित करण्याला डॉ. बाबासाहेबांनी अधिक महत्त्व व भर दिला आहे. याचा प्रथम विचार केला गेला पाहिजे. धम्माच्या वर्गीकरणाप्रमाणे धम्म म्हणजे जीवन शुचिता राखणे, जीवनात पूर्णतः प्राप्त करणे, निब्बाण प्राप्त करणे, तृष्णा, त्याग, सर्व संस्कार अशाश्वत असल्याचे मानणे, कर्म हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार असल्याचे मानणे. काया, वाचा, मनाची शुद्धता म्हणजे जीवन शुचिता. दान, शील, शांती, वीर्य (उत्साहपूर्वक प्रयत्न), प्रज्ञा, या पारमितांच्या सहाय्याने जीवनात पूर्णतः साधता येते. राग लोभादी विकारांचा निग्रह म्हणजे निब्बाण, निब्बाण निर्दोष जीवनाला प्रतिशब्द आहे. त्याची प्राप्ती मध्यम मार्गाच्या म्हणजेच अष्टांगिक मार्गाच्या परिपालनाने होते. तृष्णा किंवा लोभामुळे अनेक वाईट प्रसंग उद्भवतात. मारामारी, आघात, वादप्रतिवाद, भांडण, निंदा, असत्य या सर्वांचे मुळ, तृष्णा किंवा लोभ यात आहे. त्यामुळे अमर्याद धन संग्रहाच्या इच्छेसंबंधी माणसाने सावध असले पाहिजे असा बुध्दांचा उपदेश आहे. सर्व वस्तू अनित्य आहेत. त्या कारणांमुळे अस्तित्वात येतात व कारण संपले की, त्यांचे अस्तित्वही संपते. सजीव प्राणी ज्या भौतिक घटकांचा बनलेला असतो त्याचे पृथक्करण झाले की, त्याचाही मृत्यू होतो. कोणत्याही वस्तू संबंधी आसक्ती न बाळगणे हा अनित्यतेच्या सिध्दांताचा आशय आहे. जगातील नैतिक व्यवस्थेचे संचालन कर्मनियमाने होते. नैतिक व्यवस्था वाईट असेल तर त्याचे कारण मनुष्य अकुशल कर्म करतो हे आहे. नैतिक व्यवस्था चांगली असेल तर त्याचा अर्थ मनुष्य कुशल कर्म सत्कर्म करतो हे आहे. म्हणून बुध्दांनी जगाला चांगल्या नैतिक व्यवस्थेचा लाभ होण्यासाठी कुशल कर्म करण्याचा उपदेश केला आहे. अकुशल कर्माने नैतिक व्यवस्थेची हानी होते व त्याने मानवता दुःखी होते असा संदेश बुध्दांनी कर्मसिध्दांतातून प्रसारित केला आहे.




अधम्म म्हणजे दैवी चमत्कृतीवर, ईश्वरावर, ब्रम्ह सायुज्यावर आधारित धर्मावर, आत्म्यावर, यज्ञयागावर, काल्पनिक अनुमानावर विश्वास ठेवणे, धर्मग्रंथाचे केवळ पठण व धर्मपुस्तके प्रमादातीत आहेत, असे मानणे हा सुद्धा अधर्म आहे. दैवी चमत्कृतीवरील विश्वास भ्रामक समजुती निर्माण करतात. माणसाला बुद्धीवादी बनविणे, माणसाला स्वतंत्रतापूर्वक सत्याचा शोध लावण्यासाठी सिध्द करणे, ज्या भ्रामक समजुती माणसाची शोध करण्याची प्रवृत्ती मारतात त्याचे उगमस्थान नष्ट करणे, हा बुध्दांचा उद्देश होता. त्यामुळे त्यांनी भ्रामक समजुतींना अयोग्य ठरविले. जग रचलेले नसून विकास पावलेले आहे, असे बुध्द मानीत होते. म्हणून त्यांनी ईश्वरावरील विश्वास सम्यक दृष्टीला बाधक ठरविला. पुजा व प्रार्थना यांचा उत्पादक असलेल्या ईश्वरामुळे पुरोहित वर्ग निर्माण होतो. सर्वप्रकारच्या खुळ्या समजुती निर्माण करणारा पुरोहित दुष्ट बुध्दी असल्याचे बुध्दांनी सांगितले. बुध्दांच्या मते कोणतीही गोष्ट सत्य म्हणून स्वीकारायला तिला काही ना काही प्रमाण असले पाहिजे. प्रत्यक्ष व अनुमान असे प्रमाणाचे दोन प्रकार आहेत. या दोन्ही कसोटीवर ब्रम्ह्याचे अस्तित्व सिद्ध होत नाही. त्यामुळे त्यांच्या मते ब्रम्ह सायुज्यावर आधारित धर्म अधर्म आहे. आत्म्याचे अस्तित्व नाकारताना बुध्दांनी जी गोष्ट अस्तित्वात आहे ते मन आहे, हे सांगितले. आत्म्याच्या विरूध्द त्यांनी नामरूपाचा सिध्दांत मांडला. त्यांच्या मते प्राणी हा काही भौतक तत्वे व मानसिक तत्वे यांच्या संमिश्रणाचा परिणाम आहे. त्यांना स्कंध असे म्हणतात. रूप स्कंध हे पृथ्वी, जल, अग्नी, वायु या चार तत्वांचा परिणाम आहे. नाम स्कंधाला विज्ञान (चेतना) असे म्हणतात. त्याची उत्पत्ती या चार भौतिक घटकांच्या संमिश्रणाने होते. त्यानुसार प्राणी जी काही क्रिया करतो त्यामागे चेतनाशक्ती (विज्ञान) कार्यरत असते. बुध्दांनी आत्म्याच्या अस्तित्वाचे खंडन याप्रकारे केले आहे. सुरापान, पशूबळी व स्वच्छंद आचरण अशा घृणास्पद प्रकारावर आधारलेल्या धर्माला बुध्दांनी हिन लेखले. असा धर्म नैतिक व्यवस्थेला हानी पोहोचवतो, असे त्यांचे मत होते. त्यामुळे चांगल्या जीवनाची तत्वे म्हणून बुध्दांच्या धम्मात पंचशीलाला महत्वाचे स्थान दिले गेले आहे. काल्पनिक अनुमानावर आधारलेला धर्म माणसामाणसातील संबंधात निरूपयोगी असल्याचे बुध्दांचे मत होते. मी कोण आहे. कोठून आलो व कोठे जाणार या प्रश्नांना माणसाच्या प्रत्यक्ष जीवनात काही स्थान नाही. असे प्रश्न निरर्थक आहेत. जगाची निर्मिती एकदम झाली नाही. जगाची उत्क्रांती झाली आहे, असे ते मानीत असत. काही ब्रम्ह्याने तर काही प्रजापती ने विश्व निर्माण केले, असे म्हणणाऱ्यांची गणना त्यांनी मुर्खात केली आहे. बुध्द सर्वांना शिक्षण असावे, या मताचे होते. विद्येला शीलाची जोड असण्याविषयी ते आग्रही होते. म्हणून ते म्हणत जो विद्वान आहे, त्यांच्या अंगी शीलही असले पाहिजे. माणसाला हजारो गाथा किंवा पुस्तके पाठ असून चालत नाही. तर त्याला त्याचा अर्थ व आशय विषद करून सांगता आला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे बुध्दांच्या मते धर्मग्रंथाचे केवळ पठण हा धर्म नाही. खरा धर्म हा धर्मग्रंथात नसून धर्म तत्त्वांचे पालन करण्यात आहे. धर्मपुस्तके प्रमादातीत आहेत, असे मानण्याला बुध्दांचा विरोध होता. कोणतेही वाङ्मय प्रमादातीत नाही. प्रत्येक गोष्टीची परीक्षा व पुन्हा परीक्षा झाली पाहिजे, यावर त्यांनी जोर दिला. ते विचार स्वातंत्र्याचे भोक्ते व पाठीराखे व समर्थक होते. कालाम सुक्तात त्यांनी विचार स्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला आहे.

सद्धम्मात मनाची मलिनता दूर करण्याच्या प्रयत्नावर भर दिला गेला आहे. मन सर्वांचे मुळ आहे. मनात दुष्ट विचार असतील तर माणसाचे विचार, शब्द व कार्य दुष्ट बनतात. सद्विचार असतील तर शब्द व कार्य दोन्ही चांगली असतात. म्हणून चित्तशुद्धी धम्माचे सार आहे, हे बुध्दांनी सांगितले. जग हे धम्मराज्य व्हावे, हा सद्धम्माचा उद्देश आहे. माणसाचे दुःख हे माणसामाणसातील अनुचित व्यवहाराचा परिणाम आहे, असे बुद्ध मानतात. ती धम्मानेच नाहीशी होऊ शकतात, हे त्यांनी सांगितले. त्यामुळे सदाचरणासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या गोष्टी धम्माने शिकविण्याची गरज त्यांनी प्रतिपादिली. ज्ञान प्राप्त करण्यावर कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी असता कामा नये. हा मार्ग सर्वांसाठी खुला असला पाहिजे. धम्माने प्रज्ञेला उत्तेजन द्यावे. विद्या सर्वांना मोकळी करावी, याला बुद्धांनी अग्रक्रम दिला आहे. विद्या पूरेशी नाही. तिच्यामुळे पोकळ पांडित्य निर्माण होते. असे म्हणत बुद्धांनी विद्येच्या उपयोगावर भर दिला आहे. प्रज्ञा व विद्या यात त्यांनी भेद केला आहे. हा ज्ञान व शहाणपणा यातील भेद आहे. सद्धम्माची स्थापना करण्यासाठी सामाजिक भेदाने उत्पन्न झालेले निर्बंध व माणसामाणसात भेद करणारे अडसर मोडून काढले पाहिजे. माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावरून नव्हे तर कार्यावरून ठरवावे. ही सद्धम्माची शिकवण आहे. समतेच्या भावनेची अभिवृद्धी करणे हे सद्धम्माचे मुख्य सूत्र आहे. धम्माच्या धम्म, अधम्म व सद्धम या वर्गवारीतून बुध्दांना माणसाच्या दुःखात भर घालणारी व्यवस्था बदलवून त्याजागी शोषणमुक्त समाजरचना निर्माण करायची होती. डॉ. बाबासाहेबांनी हा संबंध माणसाच्या सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याशी जोडला. ते धम्माला शासन व्यवस्थेचा पर्याय मानतात. या अंगाने धम्म समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. ■ ■

जोगेंद्र सरदारे
मो. 9422138322

# तथागत बुद्धाचा मानवतावाद




**नवा ज्ञानमार्ग :-** या जगाला नव्या ज्ञानाचा मार्ग दाखवणारे पहिले मानवतावादी तत्त्वज्ञ हे तथागत गौतम बुद्ध होत. त्यांनी आपल्या जीवनात कार्यकारणभाव सिद्धांतावर मानवतावाद उभा केला. मानवी जीवन हे दुःखाने भरले आहे. दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे. तृष्णेवर विजय प्राप्त करणे ही ज्ञानाची सर्वोत्तम अवस्था असते.

तथागत गौतम बुद्ध यांनी सांगितलेले त्यांचे तत्त्वज्ञान हे 2500 वर्षापेक्षा जास्त झाले असले तरी, बुद्ध धम्माचा ज्ञानप्रकाश आजही महत्त्वाचा आहे. पुढेही महत्त्वाचा आहे जोपर्यंत मानव विश्व या धर्तीवर उभे आहे; तोपर्यंत गौतम बुद्धाचा विचार सदोदित प्रेरणा देणारा ठरणार आहे.

**धर्मातील विविध विचार :-** या विश्वात अनेक धर्म आहेत. प्रत्येक धर्माचे तत्त्वज्ञान वेगवेगळे आहे. अनेक लोक म्हणतात, प्रत्येक धर्माने मानव समान मानले आहे. पण व्यवहारात मात्र तसे दिसत नाही. अनेक धर्माचा पाया हा दैवी व देव या सिद्धांतावर आधारित आहे. अनेक धर्म माणसाला गौणत्व ठरवतात व देवाला श्रेष्ठत्व स्थान देतात. आपल्याच मानवाचे शोषण करतात. याला समानतेचा धर्म म्हणता येणार काय? जर प्रत्येक धर्मात माणसाला समान मानले असते तर इतर धर्माची जगाला आवश्यकता भासली असती का?

**तथागत बुद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावाद :-** तथागत गौतम बुद्ध यांनी स्वतःला मानवाचा पुत्र मानले आहे. जीवशास्त्रीय प्रक्रियेच्या नैसर्गिक सिद्धांत त्यांनी मान्य केला. म्हणून आज अनेक देश बुद्ध धम्माचे पाईक झाले आहेत. कारण बुद्ध धर्माचा पाया हा स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यावर आधारित आहे. त्यामुळे आजही या धम्माची जगाला गरज आहे. जेव्हा जेव्हा युद्धाचे ढग आकाशात पांघरून येतील तेव्हा तेव्हा या ढगांना पराभूत करण्यासाठी धम्माच्या वैचारिक तत्त्वज्ञानाची गरज पडते. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे मानवी समाजाची प्रगती करणारे आहे. नुकतीच नागपूरची दंगल कोणीतरी प्रायोजित होती का असे लोकांना वाटत आहे. बिनचेहऱ्याच्या मागे लपलेले मास्टरमाइंड दिसत नाही. त्यामुळे सारेच व्यवस्था व्हेंटिलेटरवर आलेली आहे, असे लक्षात येत आहे. तथागत बुद्धाचा धम्म हा माणूस केंद्री आहे. माणसाला नाकारणाऱ्या अव्याकृत तत्त्वज्ञानाला नाकारून इहवादी तत्त्वज्ञान मांडले आहे. बुद्ध तत्त्वज्ञानाचे खरे सार हे मानवाच्या परिवर्तनातच आहे. धम्मवाद हाच जीवन मार्ग आहे. त्यात जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. विज्ञानाच्या कसोटीवर उतरणारा हा एकमेव धम्म आहे. आज अनेक देशावर संकट आली तर मानवतावादी विचारांच्या निर्मितीसाठी बुद्धाचे तत्त्वज्ञान माणसाला महाऊर्जा देत आहे. आत्मा, नरक, परमात्मा अशा गोष्टींना छेद देऊन, निखळ माणूस तयार करणारा हा धम्म जगाच्या कल्याणाला वाट दाखवत आहे. बदलत्या जीवनशैलीपासून तर बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानातही तथागत बुद्धाचा धम्म हाच जगाचा उद्धारक आहे. अल्बर्ट आईन्स्टाईन्स बुद्धधम्माविषयी म्हणतो की, ‘भविष्य का वैज्ञानिक धर्म बौद्ध धम्म होगा’ हे वाक्य आज नक्कीच खरे ठरले आहे.

तथागत गौतम बुद्ध आपल्या उपासकांना धम्माचे तत्त्वज्ञान सांगताना म्हणतात की, ‘जो तुमने सुना है।, उस मे विश्वास न करे बैठो, न किसी बात में इसलिये विश्वास कर लो कि ये सिद्धांत तुम्हे पीढिओ से प्राप्त हुए है। किसी बात में इसलिये भी विश्वास न करलो की लोक असे आंख मूंद कर मानते है, न इसलिये विश्वास करो की कोई वृद्ध महर्ष ऐसा कह गये है, न उन सत्त्यो पर विश्वास कर लो, जिन पर परंपरागत रूप से चलते हुए तुम्हारा संपर्क हुआ है, अपने गुरूओं या बुजुर्गो की किसी उक्ति पर प्रमाणपत्र की तरह विश्वास कर लो। स्वयं सोचो, गवेषणा करो, विश्लेषण करो और इस प्रकार मंथन से निकला निष्कर्ष तुम्हे बुद्धिसंगत और सबके लिये हितकर लगे तो उसमे विश्वास करो, उसे अपने जीवन मे ढाल लो।’ हे विचार आजच्या परिप्रेक्षात अत्यंत महत्त्वाचे आहेत.

जगात आणि देशात अंधभक्ताची भरती येत असताना अशा अंधभक्ताना खरे वास्तव दाखवण्यासाठी या विचारांची खरी गरज आहे. गंगा नदीचे पाणी अस्वच्छ आहे असे प्रमाणपत्र भारत जल संस्था देत असताना, गंगेचे पाणी शुद्ध आहे असे म्हणणे बिनडोकपणाचा कळस गाठणारेच आहे. अशा धोकादायक भ्रमापासून भारतीयांनी स्वतःला वाचवले पाहिजेत. धर्माच्या गागलमधून संस्कृतीच्या प्रवाहात सामील होणे म्हणजे विज्ञानवादी जीवनतत्वज्ञानाला नकार देणे होय. अशा बनावटगिरीच्या धुर्त, कावेबाजापासून भारतीयांनी वाचले पाहिजेत. हेच बुद्ध तत्त्वज्ञानाचे खरे सार आहे.

**निष्कर्ष :-** बुद्ध हाच खऱ्या लोकशाहीचा उद्गाता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले भारतीय संविधान हे तथागत बुद्धाच्या मानवतावादी तत्त्वज्ञानावर उभे आहे. या तत्त्वज्ञानानुसारच देशाने एक प्रगतीच्या टप्पा पार केला आहे. समर्थन आणि विरोध या दोन्ही विचारांचा सम्यक मार्ग भारतीय संविधानातून आपल्याला दिसला आहे. आजच्या धार्मिक दंगलीच्या काळवंडलेल्या वातावरणात बुद्धाचे तत्त्वज्ञान हेच मानवतावादी तत्त्वज्ञान आपणास उपयोगाचे आहे आणि हेच मानवतवादी तत्त्वज्ञान आपल्याला नवा दीपस्तंभ ठरेल. तथागत बुद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावाद हाच जीवनाला नवी संजीवनी देऊ शकतो. तोच योग्य मार्ग आहे असे मला वाटते. ■ ■



संदीप गायकवाड
मो. 9637357400

# भगवान बुद्धांची सामाजिक निती

**भगवान बुद्धांकडे अनेक लोक अनेक दृष्टीने बघतात. त्यांच्या आकलन शक्तीने बघतात. परंतु बुद्धांचे तत्वज्ञान समजून घ्यायचे असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने बघावे लागेल. त्यांनी बुद्धांच्या दर्शन शास्त्रीय महासागरातून शुद्ध मोती निवडले आणि भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ बौद्ध अनुयायास दिला. डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीपथातूनच बुद्धांचा धम्म या लेखात चर्चिला जाणार आहे.**

तथागत भगवान बुद्धाचे नाव सिद्धार्थ गौतम. शाक्य वंशाचा राजा शुद्धोधन आणि महामाया यांच्या पोटी जन्मले म्हणून त्यांना शाक्यमुनीसुद्धा म्हटले जाते. सिद्धार्थ गौतम यांचा जन्म इ.स. पूर्व 563 नेपाळमधील कपिलवस्तू स्थित लुम्बिनी येथे वैशाख पौर्णिमेला झाला. त्यांच्या जन्माच्या सहा दिवसात माता महामाया यांचे निधन झाले आणि त्यांची मावशी महाप्रजापती हिने सिद्धार्थाचा सांभाळ केला. त्यांचा विवाह यशोधरा नामक सौंदर्यवती व चारित्र्यवान मुलीसोबत झाला. त्यांना राहुल नावाचा एक मुलगा झाला. वडील शुद्धोदनाने सिद्धार्थ संन्यासी होऊ नये म्हणून अथक प्रयत्न केले. परंतु शाक्य व कोलीय यांच्या पाणी वाटपावरून झालेल्या वादात अनेक चर्चेअंती युद्धात सहभागी होणार नाही ही भूमिका घेऊन देशत्याग करून परिव्रज्या धारण करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे म्हणणे होते की वैराने वैर शमत नाही. वैरावर प्रेमानेच मात करता येते.

सिद्धार्थाच्या देशत्यागाचा वृत्तांत आधीच राजवाड्यात पोहोचला होता. राजवाड्यात माता-पिता, पत्नी यशोधरा सर्व शोकाकूल होते, आक्रसून रडत होते, दुःखमय, कष्टी झालेले होते. त्यांनी सिद्धार्थाला अडवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. परंतु ते अपयशी ठरले. ते यशोधरेच्या महालात गेले, तिला काय बोलावे काही सुचत नव्हते. त्यांना वाटले माझ्या निर्णयाने ती कोलमडून पडेल व तसे झाले नाही. तिने धीराने म्हटले, ‘मी आपल्या जागी असते तरी दुसरे काही करू शकले नसते, ‘कोलियांच्या विरुद्ध युद्ध करण्याच्या कामी मी निश्चित भागीदारीत नसते.’ बाळ राहुलच्या संगोपनाची व सासू सासऱ्यांना सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारून ती केवळ सिद्धार्थ सोबत गृहत्याग करण्याचा निर्णय घेत नाही, तर पती सिद्धार्थाला धीर देते की ‘तुम्ही मातापित्यांची, बाळ राहुलची काहीही काळजी करू नका. माझा प्राण असेपर्यंत मी त्यांचा सांभाळ करीन. तुम्ही परिव्राजक होत आहात तर आपण एक असा जीवनमार्ग शोधून काढा की तो सकल मानवजातीला कल्याणकारी ठरेल. हिच केवळ माझी इच्छा आहे.’ एवढा महान संदेश पती सिद्धार्थाला निरोप देताना देते. या वाक्याचा प्रभाव सिद्धार्थाच्या मनावर खोलवर पडला. अनेक साहित्यात सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या म्हणजे महाभिनिष्क्रमनच्या बाबतीत अनेक गैरसमज पसरवले गेले आहेत. ते सर्व खोटे व थोतांड आहेत. परिव्रज्या (संन्यास) धारण करण्याच्या वेळी सिद्धार्थाचे वय केवळ एकोणतीस वर्षाचे होते. एक तरुण राजकुमाराला भिक्षापात्र घेऊन गृहत्याग, राजमहाल त्याग करणे हे महान त्याग होते. सिद्धार्थाच्या देशत्यागाने कोलीय व शाक्य यांच्यातील युद्ध कलह संपले असले तरी या सामाजिक संघर्षाचे उत्तर शोधून काढण्याचा निर्णय घेतला. अनेक ऋषींच्या आश्रमात राहून शिक्षण घेत राहिले यात प्रामुख्याने सांख्य तत्वज्ञान, समाधी मार्गाचे शिक्षण, वैराग्याची कसोटी शिकून घेतले. सहा वर्षे कठीण तपश्चर्या व आत्मक्लेश करूनही हवे ते साध्य झाले नाही. उलट शरीर क्षीण व दुबळे झाले, त्यामुळे मन शांत राहिले नाही हे सिद्धार्थाला समजले व अन्न प्राशन करून ताजेतवाने होऊन नव्या प्रकाशाच्या, चिंतनाच्या मार्गाला लागले. चाळीस दिवस पुरेल एवढे अन्न गोळा करून ठेवले व चिंतनास बसले. या चिंतनात त्यांना समजले की जगात दोन समस्या आहेत एक दुःख व दुसरे दुःख कसे नाहीसे करावे? शेवटी दुःख कसे नष्ट करावे याचा मार्ग सापडला. अज्ञान नष्ट झाले व ज्ञान उदयास आले व नव्या धम्माचा शोध लागला. सिद्धार्थाला सम्यक सबोधी प्राप्त झाली व सिद्धार्थाचा ‘बुद्ध’ झाला. बुद्धाने नवीन धर्म अशा काळात शोधून काढला, ज्या काळात ब्राम्हणी तत्वज्ञानाचे महत्व होते. भारतात कर्मकांड, यज्ञयाग बळीप्रथांचे स्तोम माजले होते. ब्राम्हणी तत्वज्ञानाची रचना चातुर्वणावर आधारित उभी होती. सर्वात वर ब्राम्हण, त्याच्या खाली क्षत्रिय, त्याच्या खाली वैश्य आणि शूद्र सर्वांच्या खाली. ही रचनाच मुळात विषमतेवर आधारित होती. सर्वप्रथम बुद्धाने या चातुर्वर्ण्याचा विरोध केला. तो म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग होय. आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मांत, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती व सम्यक समाधी. भगवान बुद्धाने अष्टांगिक मार्गास श्रेष्ठ धर्म म्हटले आहे. भगवान बुद्धाने धम्मात सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाने पावित्र्याचा मार्ग (पंचशील अनुसरण), सदाचाराचा मार्ग (आर्य अष्टांगिक मार्ग), शील मार्गाचा (दहा पारमिता) अवलंब केला तर त्यामुळे दुःखाचा निरोध होईल. टीकाकार बुद्धाच्या धम्माकडे निराशावादी धम्म म्हणून बघतात. कारण बुद्ध दुःखाचे अस्तित्व सांगतात. दुःखाचे अस्तित्व सांगत असताना दुःख नष्ट करण्याचे उपाय सुद्धा सांगतात. याकडे टीकाकार कानाडोळा करतात. धम्मात मानवी जीवनाचा उद्देश आणि आशा दोहोंचाही अंतर्भाव आहे. धम्माचा मुख्य हेतु अविद्या नष्ट करणे, अविद्या म्हणजे दुःखाच्या अस्तित्वाचे मुख्य कारण आहे. म्हणून भगवान बुद्धांचा धम्म हा निराशावादी नाही हे सिद्ध होते.




**धम्म म्हणजे** – जीवन सुचिता राखणे म्हणजे धम्म म्हणतात, जीवनात पूर्णता राखणे म्हणजे धम्म म्हणतात, निब्बाण (निर्वाण) प्राप्त करणे म्हणजे धम्म म्हणतात, निब्बाण व्याख्या तथागत इतर धर्मापेक्षा वेगळी करतात. यात मोक्षाला स्थान नाही. अष्टांग मार्गाने निब्बाण प्राप्त करता येते. प्रज्ञा शील, करुणा, मैत्री याचे अपूर्व मिश्रम म्हणजे सद्धम्म होय ही व्याख्या अधिक योग्य ठरते. बुद्धाने पुनर्जन्माविषयी अगदी वैज्ञानिक विश्लेषण केले आहे. मनुष्याच्या मृत्यूनंतर काहीही उरत नाही. बुद्धाच्या मते पृथ्वी, आप, तेज, वायू, हे मनुष्याच्या अस्तित्वाचे चार पदार्थ आहे. मनुष्य देह मृत झाल्यानंतर हे घटक शरीराबाहेर निघून जातात व आकाशात जे समान पदार्थ सामूहिक रूपाने आहेत. त्यात मिळून जातात. जेव्हा हे चार घटक आकाशात तरंगणाऱ्या समूहाला मिळतात, तेव्हा एक नवा जन्म होतो. या अर्थाने भगवान बुद्ध पुनर्जन्म मानतात. बुद्धांचा प्रतित्यसमुत्पाद म्हणजे कार्यकारणभाव म्हणजे जिवाच्या दुःखाचे बुद्धाने केलेले निदान होय. बुद्ध विचारच देशात नव्हे जगात शांती, समता, स्वातंत्र्य, न्याय प्रस्थापित करू शकतो. अशी ही बुद्धांची सामाजिक नीती राष्ट्रीयतेकडे घेऊन जाणारी आहे. आजच्या युद्धसदृश्य परिस्थितीत युद्ध नको बुद्ध हवा हेच महत्वाचे वाटते. ■ ■

उज्वला गणवीर
मो. 9021410354

# उदंड प्रतिसादात गाजले दुसरे महायुद्ध

## दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर हे नाटक बघण्यास प्रेक्षकांची सभागृहात खचाखच गर्दी

**नागपूर :** युद्ध हे कोणत्याही समस्येचे अंतिम उत्तर नव्हे. अनेकांची कुटुंबे उद्धवस्त होतात तर माणुसकी धोक्यात येते. त्यामुळे या जगात युद्ध नव्हे तर बुद्ध हवा असा संदेश देणारे दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर हे नाटक साई सभागृहात सादर झाले. भरगच्च सभागृह आणि उदंड प्रेक्षक लाभले हे नाटक बानाई या संस्थेने निर्मित केले. विख्यात नाटककार प्रभाकर दुपारे यांनी लिहिलेले आणि प्रमोद भुसारी यांनी दिग्दर्शित केलेल्या नाटकाच्या सादरीकरणाने चांगले नाटक असेल तर नागपूरकर प्रेक्षक भरभरून दाद देतात हे सिद्ध केले. प्रेक्षक गृहात जागा मिळाली नाही म्हणून शेकडो प्रेक्षकांनी खाली बसून नाटकाला दाद दिली. दुसऱ्या महायुद्धात नाझी, हिटलरने निर्माण केलेला साम्राज्यवाद आणि भारताला निर्माण झालेला धोका ओळखून डॉ. आंबेडकरांनी इंग्रजांना या महायुद्धात साथ दिली. या मध्यवर्ती संकल्पनेला धरून अँड. विमालसूर्य चिमणकर यांनी लिहिलेला पुस्तकाचा आधार घेऊन प्रभाकर दुपारे यांनी हे नाटक लिहिले. वेगवान कथानक आणि प्रभावी संवाद असलेल्या या नाटकाला प्रमोद भुसारी यांनी कल्पक दिग्दर्शनातून साकार केले. नेपथ्य देखील भुसारींचे होते. वेशभुषा डॉ. सुचित्रा भुसारी, सहाय्यक दिग्दर्शन अशोक गवळी, प्रकाश शिवशंकर माळोदे, रंगभुषा बाबा खिरेकर, यांचे होते. संगित चारूदत्त जिचकार व सज्रपेल इफेक्ट जनाई इंटरटेंटोंट यांचे होते.यात कलावंत-प्रथमेश वलीवकर, अनिल पालकर, मुकुंद वसुले, अतुल भुसारी, विनोद तुंबडे, अशोक गवळी, मोहन पांडे, सारनाथ रामटेके, मीना देशपांडे, सीमा गोडबोले, राकेश खाडे, भास्कर मेश्मराम, बिस्मार्क भिवगडे, शितल दोडके, अजय वेखंडे, अशोक वाचनेकर, उषा वाचनेकर, उमेश मरडवार, राजेश चवडे, रश्मी लांडे, समीर खंडाळे, अजय तायवाडे, चद्रकांत साळुंखे, अनंत घुलक्षे, वैभव कट्यारमल, स्वराज बावनकर, आर्यन लांजेवार, अर्चना खरे, डॉ. रवींद्र भुसारी, अशलेश मेश्राम, चित्तरंजन कावरे, गुणधना बोरकर, प्रिती चव्हाण, साधना बोरकर, सुनिल मोहदीवाले कलावंतांनी भूमिका केल्या. सुरूवातीला रणजीत मेश्राम, विलास गजघाटे, बानाईचे अध्यक्ष अरविंद गेडाम, सचिव जयवंत इंगळे व मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून उद्घाटन केले. या नाटकाचे महाराष्ट्रभर 100 प्रयोग करण्याचा मानस गेडाम यांनी बोलून दाखविले.



## स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करावा : ॲड महेंद्र गोस्वामी



**भंडारा/पवनी :** विधी सेवा समिती व नगर परिषद पवनी यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषदेच्या अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार व मुलभूत कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून जेष्ठ विधीज्ञ ॲड महेंद्र गोस्वामी हे होते. आजच्या स्पर्धेच्या युगात एमपीएससी व युपीएससीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारतीय राज्यघटनेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असून मौखिक व लेखी परीक्षेत संविधानाच्या विषयावर हमखास प्रश्न विचारले जातात.त्यामुळे जर यश संपादन करायचे असेल तर भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये समजून घ्यावेत असे आवाहन जेष्ठ विधीज्ञ ॲड. महेंद्र गोस्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.
या मार्गदर्शन कार्यशाळेचे संचालन पवनी न्यायालयातील विधी सेविका फाल्गुनी भुरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन न.प. अभ्यासिकेतील ग्रंथपाल गजानन कोहाट यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी उपस्थित होते.




## तथागत बुद्ध विहार हिवरी नगर

अध्यक्ष -दिलीप रामटेके, सचिव-सत्यवान मेश्राम, विहारा अंतर्गत-सम्राट अशोक अध्ययन कक्ष 3 जानेवारी 2021. 23 विद्यार्थी नोकरीला लागले. उपक्रम-पाली भाषा अध्ययन निशुल्क. जापनीस भाषा प्रशिक्षण. जूनियर आय.ए.एस परीक्षा. कराटे क्लासेस. वर्षभर वंदना व प्रबोधन. सर्व महापुरुषांच्या जयंती साजऱ्या. विवाह नोंदणी निशुल्क. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आर्थिक बचत केंद्र तीन वर्षापासून सुरू. वार्षिक उलाढाल 16. 30 लाख रुपये आहे.

संवाद मित्र, प्रीती तिरपुडे
7972119871



हैंड्स फॉर केयर फाउंडेशन नागपूर, व अभिमान महिला अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नागपूर द्वारा बुद्ध जयंती निमित्त नेत्र तपासणी शिबिर व मोतियाबिंदु लेंस सर्जरी शिबिर आयोजित करण्यात आला आहे.

## रुग्णांना फळ वाटप करून केला वाढदिवस साजरा



**पवनी :** पवनी तालुक्यातील आसगाव येथील रहिवासी भंडारा जिल्हा मजूर सहकारी संस्था चे संचालक, तथा भंडारा जिल्हा युवक काँग्रेसचे महासचिव मोहित अशोक मोहरकर यांनी त्याचे वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय पवनी येथे रुग्णांना फळ वाटप करून तसेच आसगाव अंगणवाडीतील लहान मुलांना पुस्तके वाटप करून वाढदिवस साजरा केला. यांप्रसंगी अंगणवाडी सेविका लक्ष्मीताई फुंडे ,प्रमिला सावरबांधे, सौ धारने, जीवनभाऊ फुंडे, शेखर आकरे, रिंकेश नखाते, आनंदराव मुंडले, रामेश्वर मोटघरे, रामभाऊ कुर्झेकर, शंकर तेलमासरे रामचंद्र पाटील, कुंडलिक हत्तीमारे, धर्मेंद्र नंदरधने, रिंकेश नखाते, डॉ धिरज लांबट, जियाभाई, लेकराम मेंढे, मनोहर मेश्राम उपस्थित होते.




## बुद्ध पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा उत्सव व शांतीवन अन्नछत्र सेवा उद्घाटन

**नागपूर :** बुद्ध पौर्णिमा उत्सव आणि शांतीवन अन्नछत्र सेवा उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रित करीत आहोत. दिनांक 12 मे 2025 (सोमवार), शांतीवन, चिचोली बुद्ध विहार प्रकल्प, नागपूर, सकाळी 12: 00 वाजता पासून विशेष परित्त पठन भदंत कौंडिण्य (त्रिपुरा) भगवान बुद्धांचा जन्म, बोधीप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तीनही महत्त्वाच्या घटनांवर आधारित विशेष परित्त पठन, भगवान बुद्धांचा जन्म, बोधीप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तीनही महत्त्वाच्या घटना एकत्र साजऱ्या करताना आपण करुणा, शांती आणि प्रेमभावनेने एकत्र येऊया आणि परित्त पठन करूया. तसेच, अन्नदान ही श्रेष्ठ सेवा म्हणून शांतीवन अन्नछत्र सेवा या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात येईल. बुद्धांचे विचार आपल्याला शांती आणि प्रगतीच्या मार्गावर नेवोत अशी सदिच्छा. इंडियन बुद्धिस्ट कौन्सिल , भारतीय बौद्ध परिषद शांतीवन चिचोली प्रकल्प, नागपूर 9371270649 यांनी व्यक्त केली आहे.

## बोधिमग्गो महाविहार येथे वैशाख उत्सव




**नागपूर :** हिंगणा रोड, भीमनगर - ईसासनी येथील भदन्त बोधिविनीत स्मृती परिसरातील, बोधिमग्गो महाविहार येथे त्रिविध पावन वैशाख पौर्णिमा निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून उपरोक्त कार्यक्रमाचे उद्घाटन ईसासनी-वागधरा ग्राम पंचायत चे सन्मानित सरपंच-अरविंदजी ढोणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोधिमग्गो सेवा संस्था चे उपाध्यक्ष-भदंत नागदिपंकर महास्थविर प्रमुख पाहुणे आहेत
बोधिमग्गो सेवा संस्था अंतर्गत असलेल्या बोधिमग्गो धम्म संडे स्कुलच्या वतीने शनिवार, दिनांक 10 मे 2025 ला चित्रकला स्पर्धा, रविवार, दिनांक 11 मे 2025 ला निबंध स्पर्धा व वेशभूषा स्पर्धा (महापुरुषांच्या जीवनावर आधारित) असणार असून सोमवार, दिनांक 12 मे 2025 ला बुद्ध पौर्णिमा निमित्त उपोषथ कार्यक्रम, उपासक उपासिका करीता ध्यान धम्म देशना, भोजन दान - संघ दान करण्यात येणार आहे. सोबतचभव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.
मंगळवार, दिनांक 13 मे 2025 ला समापन समारोह सांस्कृतिक, स्पर्धकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार असून उपरोक्त उपक्रम राबविण्यात व यशस्वी होण्यासाठी सम्मिलीत सर्वांचे योगदान प्रशंसनीय आहे. धम्म संस्थागार हे व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे व सुसंस्काराचे केंद्र असून त्या करिता मानवी जीवनात प्रत्येक नागरिकानी आपल्या कुटुंबाचा संघटित सहभाग देणे गरजेचे आहे असे आवाहन या निमित्ताने करण्यात आले.
कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी बोधिमग्गो सेवा संस्था, बोधिमग्गो महाविहार दायक दायीका सभा, बोधिमग्गो धम्म संडे स्कुल, बोधिमग्गो कम्युनिटी किचन सेंटर, बोधिमग्गो धम्म सेवा पथक व परिसरातील नागरिकांचे सहकार्य लाभले आहे.

## महत्वाचे

### रमाई बुद्ध विहारात सत्कार व व्याख्यान



**नागपूर :** रमाई बुद्ध विहार, रमाईवाडी श्रीनगर नागपूर येथे, बुद्ध जयंतीला 12 में 2025, सोमवार रोजी सकाळी 9.30 वाजता,UPSC उतिर्ण नागपूरचे बौद्ध विद्यार्थी 1. सावी बुलकुन्डे (517) 2.तनिष्क गेडाम (531) यांचा सत्कार करण्यात येईल तर रणजित मेश्राम यांचे बुद्ध धम्म आणि आंबेडकर यावर व्याख्याने आयोजित करण्यात आले आहे असे धर्मेश प्रसेनजित(फुसाटे) यांनी कळविले आहे.

### तथागत सम्यक संबुद्ध यांची जयंती

**नागपूर :** रतनसुत्त बुद्ध विहार दिघोरी येथे सोमवार दिनांक 12 मे 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण व सामूहिक बुद्ध वंदनेने तसेच उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनामध्ये होत आहे, तरी आपण आवर्जून या कार्यक्रमाला उपस्थित राहावे. असे आवाहन केले आहे.

### संबोधी महाविहारात बुद्ध जयंती

**नागपूर :** संबोधी महाविहार, धाडीवाड ले आउट. दि. 12/5/ 2025 ला सकाळी 9:30 वाजता सामूहिक बुद्ध वंदना. रात्री 7: 00 वाजता विविध स्पर्धामध्ये सहभागी झालेल्यांना बक्षीस वितरण आहे. विशेष अतिथी दैनिक बहुजन सौरभ चे कार्यकारी संपादक विलास गजभिये हे अध्यक्षस्थानी दिनेश पाटील राहतील असे डी. आर कांबळे यांनी कळविले आहे.

## दीक्षाभूमीवर तीन दिवसीय बुद्ध महोत्सव

### सोमवारी श्रामणेरची दीक्षा

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरी उंटखाना यांच्या संयुक्त विद्यमाने तीनदिवसीय बुद्ध महोत्सव 11 ते 13 मे दरम्यान दीक्षाभूमीवर होत आहे. 2 0 569 वी बुद्ध जयंती निमित्त होत असलेल्या या महोत्सवात सोमवार, 12 मे रोजी सायंकाळी 6 वाजता श्रामणेर दीक्षा दिली जाईल, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.



या कार्यक्रमाला बुद्धिस्ट क सेमिनरीचे प्रमुख दीक्षागुरू भदंत डॉ. धम्मसारथी यांच्यासह भिक्खू संघ व भिक्खुणी संघ उपस्थित राहतील. व यावेळी 16 ते 30 वयोगटातील उपासकांना श्रामणेर दीक्षा दिली
जाईल. यांप्रसंगी भदंत धम्मसारथी, भंते नागसेन, भंते धम्मविजय, भंते नागवंश, भंते राहुल, भंते नागाप्रकाश, भंते धम्मप्रकाश, भिक्खुनी संघप्रिया उपस्थित राहून बुद्ध, धम्म व संघ याविषयी मार्गदर्शन करतील. समारंभात उपस्थित लहानथोर अंगावर काशाय वस्त्र धारण केल्यानंतर आयुष्यभर दहा शिलांचे पालन करण्याचे व्रत घेतील. श्रामणेर दीक्षा घेऊन तथागत बुद्धांचा धम्म अनुसरण्याचा निर्धार करतील. श्रामणेर यांचे निवासी प्रशिक्षण दीक्षाभूमी स्मारक समितीच्या उंटखाना शाखेतील बुद्धिस्ट सेमीनरीत होईल. भदंत ससाई यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, 11 मे रोजी सायंकाळी 6 वाजता शांती, करुणा, मैत्री व बुद्धाचा कल्याणाचा मार्ग यावर प्रवचन होणार आहे.
या कार्यक्रमाला ॲड. शैलेश नारनवरे, प्रा. देविदास घोडेस्वार, अभिषेक सारनाथ, राहुल तेलंग, धनंजय वंजारी, आशिष फुलझेले उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी मेंढे यांच्यासह भिक्खू संघ व भिक्खुणी संघ उपासक, उपासिका प्रयत्नशील आहेत.
प्रबुद्ध हो मानवा?
मंगळवार, 13 मे रोजी सायंकाळी 6 वाजता प्रबुद्ध बागडे आणि गायक-कलावंतांतर्फे 'प्रबुद्ध हो मानवा' हा बुद्ध-भीमगीतांचा कार्यक्रम सादर करतील. यासोबतच अंगुलीमाल, आम्रपाली लघुनाट्य व भीम गर्जना नृत्य सादर करतील.



## संथागार फाऊंडेशनचा नवीन उपक्रम

**नागपूर :** महात्मा फुले यांचा सिनेमा रस्त्याच्या बाजूला झोपडीत राहणाऱ्या मुलांना एकत्र करून डॉ. एम.एस. जांभूळे यांच्या कल्पनेतून दाखविण्यात आला. त्यांना सहकार्य मेघराज वानखेडे व अरुण मेश्राम यांनी केले. एकूण 25 मुलांना हा सिनेमा दाखविण्यात आला पैकी 5 मुले व 5 मुली रस्त्याच्या बाजूला झोपडीत राहणाऱ्या कुटुंबातील होती. त्यांनी प्रथमच अस विशाल थिएटर बघितल व एस्किलेटर चा अनुभव घेतला अशी त्यांची प्रतिक्रिया होती. प्रथम वेळ असल्यामुळे मूल थोडी गडबड करत होती. मनिषा आणि यांनी मुलांना शांत ठेऊन सिनेमा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. मुलींनी सांगितलं की सिनेमा आम्हाला खूप आवडला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुली साठी खूप मोठे काम केले आहे. यामुळे मला नवीन ऊर्जा मिळाली असे डॉ. एम.एस. जांभूळे यांना वाटते.

## लुंबिणी बौद्ध सेवा समितीचा प्रबोधन कार्यक्रम



**नागपूर :** लुंबिणी बौद्ध सेवा समितीचा प्रबोधन कार्यक्रम दिनांक 12 मे 2025 ला बुद्ध जयंती कार्यक्रम वैशाख पौर्णिमा निमित्ताने प्रबोधन कार्यक्रम सायं. 6.00 वा. बुद्ध वंदना, सायं. 6.30 वा. प्रबोधन,
प्रमुख अतिथी, प्रा. माधुरी गायधनी दुपटे, बौद्धाचार्य देवीदास राऊत, मार्गदर्शक आशिष तायवाडे आदी उपस्थित राहणार आहेत. असे मारोतराव गोडबोले अध्यक्ष अभिजीत कांबळे सचिव पी.एन. भिवगडे कोषाध्यक्ष आदींनी कळविले आहे.

## निधन वार्ता

### संदेश कोटांगळे



**नागपूर :** नागपुरातील ठवरे कॉलनी निवासी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी बँक चे संचालक संदेश कोटांगळे 47 यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, एक भाऊ, बहिणी असा परिवार आहे. रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर बँकचे माजी उपाध्यक्ष टि.एन. कोटांगळे यांचे ते चिरंजीव होते.

## आजचे कार्यक्रम

**सम्यक म्युझिकल ग्रुप, मनिषनगर.**

दि. : सोमवार १२/०५/2025
वेळ : सकाळी ८.३० वाजता
स्थळ : जयदुर्गा सोसायटी नं. २, मनिषनगर गार्डनमध्ये (ओट्यावर)

**तथागत भगवान बुद्ध जयंती सर्व धर्म परिषद**

दि. : सोमवार दि. १२ मे २०२५,
वेळ : सकाळी ६.०० वाजता
स्थळ : शताब्दी चौक ते त्रिशरण चौक रॅली, सायंकाळी ७.०० वाजता.




संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर
रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर ( १०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल )
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर ( ५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें
* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)
* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१
* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३
आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648